# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५७**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष दुसरे / अंक ६ / मे २००२

## संपादकीय

### ग्लोबल वॉर्मिंग

दूरदर्शन वरील बातम्यांमध्ये आजचे तपमान दाखविण्याची पद्धत आहे. या तपमानाच्या आकड्यांकडे पाहिले की उष्णतामान वाढत चालले आहे याची सर्वसामान्यांना जाणीव होते, त्याच बरोबर गेले महिना दोन महिने जीवाची काहिली होणे, म्हणजे काय ते समजेल एवढी प्रचंड उष्णतेची लाट सर्वत्र आल्याचे अनुभवास येत होते. दहा वीस वर्षांपूर्वी 'प्रचंड उन्हाळा असतो' या यादीत विदर्भातल्या अकोला, नागपूर व खानदेशातल्या जळगावचा समावेश असायचा. लोक शक्यतोवर पुणे, नाशिक किंवा शक्य असेल तर थंड हवेचे ठिकाणी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या माथेरान, महाबळेश्वरला जाणे पसंत करीत. पण या वर्षीचे तपमानाचे गणित पार बदललेले आहे. ३५,४० च्या घरात उष्णतामान असणारे नागपूर आता इतिहासजमा झाले आहे व या वर्षी नाशिक, पुणे ४२,४३ तर नागपूर, अकोला ४५,४६ इतके आकडे वर गेले आहेत. वृत्तपत्राच्या मथळ्यातही महाबळेश्वर ३५ अंश सेल्सिअस असल्याचे छापलेले वाचावे लागले आणि एकूणच वाढणाऱ्या तपमानामुळे पृथ्वीचे काय होणार ही शास्त्रज्ञांना वाटणारी चिंता आपल्यालाही मनात वाटायला लागली.

पृथ्वीचे हवामान बदलत चालले आहे याबद्दल आता कोणाच्याच मनात संदेह नाही. ग्लोबल वॉर्मिंग ही संकल्पना आता केवळ कल्पना नाही तर जीवनातील वास्तव ठरले आहे. हा ग्लोबल वॉर्मिंगचा विषय फक्त पर्यावरणाच्या कामातूनच व जंगल तोडीतूनच निर्माण झाला नाही, तर त्याला असणारे राजकीय संदर्भ ही अतिशय गंभीर आहेत. टोरँटो येथील परिषदेत निश्चित करण्यात आलेली ध्येय धोरणे, टोकियो येथील परिषदेतील निष्कर्ष व जगभरच चाललेल्या संशोधनाच्या शोध (संदर्भ-द पॉलिटिक्स ऑफ ग्लोबल अॅटमॉसफिअरीक चेंज - इयान रोअलँड्स - १९९५) लक्षात घेतला तर या ग्लोबल वॉर्मिंगला पर्यावरणाच्या ऱ्हासाबरोबर वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व मुख्य म्हणजे बांधकामांचे वाढते प्रमाण हे घटक कारणीभूत आहेत. बांधकामांचा वेग अवाक करणारा आहे. बांधकामासाठी वापरलेल्या सिमेंट मुळे वातावरण लगेच तापते व बराच वेळ तापलेले रहाते. त्यामुळे पूर्वी 'रात्री थंड वाटते' असे म्हटले जायचे तेही आता बंद झाले आहे. पंख्याचा वारा ही गरम हवाच फिरती ठेवतो.

हे सर्व होण्याला कारणीभूत माणूसच आहे. पॉल ब्राऊनच्या 'ग्लोबल वॉर्मिंग' या पुस्तकाचे उपशीर्षक त्या दृष्टीने फार बोलके आहे. 'कॅन सिव्हिलायझेशन सर्व्हाइव्ह ?' असे उपशीर्षक पॉल ब्राऊन सारख्या या विषयातील ख्यातनाम शास्त्रज्ञाला द्यावेसे वाटते, हे भयसूचक आहे. आताच आपली कबर बांधणारा प्राणी अशी 'माणूस' शब्दाची व्याख्या करावी लागणार की काय ?

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ६ / मे २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१
५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय २रा) ॥ सांख्य योग ॥ | आशा भिडे | ३ |
| २) | आपल्या देशात खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालये का नाहीत ? | श्री. ह. देशपांडे | ९ |
| ३) | विद्यार्थी वर्तुळ- अभियांत्रिकी (भाग १) | केतन लक्ष्मण कांबळे | १६ |
| ४) | अग्निपंख | प्रा. विद्याधर वालावलकर | १८ |
| ५) | इंधन वाचविण्याचे साधे सोपे उपाय | श्री. वि. ना. कोपरकर | २१ |
| ६) | प्युपिलोमिटर | डॉ. नागेश टेकाळे | २३ |
| ७) | आधुनिक काळातील खरी शोधित- श्री. | श्री. प्रभाकर आरटकर | २६ |
| ८) | पारिभाषिक शब्दांचा अर्थ | | ३१ |
| ९) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्रीमद्भगवत् गीता (अध्याय २ रा) ।। सांख्ययोगः ।।

*गीतेच्या पहिल्या अध्यायावरील लेखानंतर सांख्य योग या दुसऱ्या अध्यायावर सौ. भिडे यांनी पाठविलेला लेख देत आहोत. - संपादक*

'मी युद्ध करणार नाही' असे अर्जुनाने ऐन युद्ध सुरु होण्याच्या वेळी म्हणावे हे एखाद्या मेरीटच्या विद्यार्थ्याने हॉलमध्ये प्रवेश केल्यावर तिथल्या वातावरणाचा परिणाम होऊन किंवा परीक्षेच्या प्रचंड दडपणामुळे म्हणावे की मी परीक्षेला बसणार नाही तसेच झाले. त्यावेळी त्या विद्यार्थ्यांच्या आई वडिलांना, गुरुला केवढा धक्का बसतो. ते चक्रावून जातात. परीक्षेची घटका तर भरत आली. अशा वेळी परीक्षेला बसण्यासाठी नाना प्रकारे समजावतात, दादापुता करून चुचकारतात, पाठीवर हात फिरवतात प्रेमाने जवळ घेऊन धीर देतात. आणि अगदीच ऐकलं नाही तर रागावतात देखील. पण लगेच पुन्हा चार समजुतीच्या गोष्टी सांगून, इतरांची उदाहरणे देऊन त्याची भीती, दडपण घालवायचा प्रयत्न करून त्याला परीक्षेला बसायला प्रवृत्त करतात. तीच प्रेमळ माता-पित्यांची, कर्तव्यदक्ष गुरुची भूमिका येथे श्रीकृष्णाने गीतेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत उत्तमरित्या वठवली आहे. अर्जुनही उत्तम योद्धा, वीर धनुर्धर, नरश्रेष्ठ, महाबाहू असा नेहमी युद्धात जिंकलेला कुशल युद्धपटू होता. समोर उभ्या असलेल्या आप्तस्वकीयांशी आतापर्यंत त्याने अनेक लढाया खेळून जिंकलेल्या होत्या. शत्रू पक्षात कोण कोण उभे आहेत हे त्याला माहीत नव्हते असे नाही. युद्धाला सामोरे जाण्यासाठीच तो रणभूमीवर आला होता. पण नुसते माहीत असणे वेगळे नि प्रत्यक्ष पाहणे वेगळे. त्या प्रत्यक्षाचा परिणाम व धृतराष्ट्राच्या मंत्रयुद्धाचा परिणाम होऊन तो 'मी युद्ध करणार नाही' म्हणू लागला.

आणि गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील अकराव्या श्लोकापासून गीतेच्या शिकवणीस प्रारंभ होतो. गीतेला अर्जुन हे निमित्त आहे. हा अर्जुन विषादयोग नाही तर सर्व सामान्यांचा 'विषादयोग' आहे. जसा पांडुरंगाचा अवतार हा फक्त पुंडलिकांसाठी नाही तर समस्त जड जीवांच्या उद्धारासाठी आहे.

पहिल्या अध्यायातील अर्जुन व दुसऱ्या अध्यायातील अर्जुन यांची भूमिका बदललेली आहे. पहिल्यात तो स्वतःच एकटा बोलतोय. आपलीच बाजू मांडतोय. माझेच म्हणणे बरोबर आहे हीच त्याची भूमिका आहे.

तेव्हा श्रीकृष्ण शांत आहे काहीच बोलत नाही. बोलणार तरी काय ? त्यालाही आश्चर्याचा धक्काच बसलेला आहे. त्यामुळे भडभडून तो अर्जुनाला बोलू देतो मध्ये न अडवता.

मग अर्जुनालाच शंका येते, माझे म्हणणे श्रीकृष्णाला मान्य नसावे असे दिसते. कृष्ण एवढेच म्हणतो, 'अरे तू हे काय बोलतोस ? हा मोह क्षत्रियाला न शोभणारा तुला का उत्पन्न झाला ? हा भ्याडपणा तुला शोभत नाही. हा मनाचा कमकुवतपणा टाकून युद्धाला उभा रहा.'' त्यावर पुन्हा अर्जुनाचा युक्तीवाद, '' वंदनीय अशा गुरुजनांना मारून मिळालेले रक्तलांच्छित राज्य मला काय करायचं ! त्यापेक्षा मी भीक मागेन, वगैरे वगैरे. पण नंतर तो हरिशरणता पत्करतो. मानसिक दौर्बल्यामुळे मला धर्म कोणता व अधर्म कोणता हे कळेनासे झाले आहे. तेव्हा जे खरोखर श्रेयस्कर असेल ते मला सांग. मी तुझा लाडका शिष्य तुला शरण आलो आहे''.

मीच बरोबर आहे असे जो पर्यंत वाटते तोपर्यंत

शिष्य ज्ञान ग्रहणाला पात्र नसतो. मार्गदर्शनाची गरज वाटणे, ज्ञान जिज्ञासा निर्माण होणे ही लक्षणे शिष्याची पात्रता सिद्ध करतात. आता अर्जुन ज्ञान ग्रहणाला पात्र झालेला होता. त्याला तू संन्यास घे, की युद्ध कर, की भिक्षा माग यापैकी अमूक कर असा निर्णय नको होता. तर निर्णया मागचे कारण हवे होते.

हा गोंधळला आहे, मोहग्रस्त झालाय त्याची मतीच कुंठित झालीय. तो गांगरलाय हे पाहून किंचित हसत भगवंत त्याला धर्म कोणता व अधर्म कोणता हे सविस्तरपणे सांगायला सुरुवात करतात. (अध्याय २ रा ११ वा श्लोक)

सुरुवातीला अर्जुनाच्या भूमिकेला 'अनार्य' 'क्लैब्य' आणि कमकुवत मनाचा' असे संबोधून त्याचा अभिमान डिवचून पाहिले पण त्याचा उपयोग झाला नाही. म्हणून सरळ सांख्यबुद्धीचे विवेचन, जीवनाचे मूलभूत सिद्धान्त, आत्मतत्व विवेचन म्हणजेच ज्ञान विवेचनास प्रारंभ केला.

पार्था नको तिथे मोह व नको त्याचा शोक हे दोन्ही गैरच. अरे जन्म मृत्यूचा शोक कशाला? आपण भूतकाळात होतो तसेच वर्तमानात आहोत व भविष्यातही असणार आहोत. आत्मा अविनाशी, नित्य, शाश्वत, अव्यय आहे. तो भावरुप आहे म्हणून त्याचा अभाव होत नाही. तो अव्यक्त व्यापक आहे.

नैनं छिन्दति शस्त्राणि नैनं दहति पावक :।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥

त्याला शस्त्रे तोडू शकत नाहीत. अग्नी जाळू शकत नाही. पाणी भिजवू शकत नाही. अगर वायू सुकवू शकत नाही. असा हा आत्मा नित्य, सर्वव्यापी, स्थिर, अचल, सनातन आहे. आत्मा इंद्रियांना व मनास अगोचर आहे. तो निर्गुण निराकार आहे. त्याचे हे स्वरुप जाणून त्याच्याबद्दल शोक करणे तुला उचित नाही.

अरे मरते ते शरीर. आत्मा नव्हे. तो अकर्ता आहे. आत्मतत्व सर्व देहात आहे. आणि त्याने सर्व व्यापले आहे. आपला मृत्यू होत नाही. देहांतर होते. हे देहांतर म्हणजे फाटके जुने वस्त्र टाकून नवे धारण करणे. म्हणून शोक व्यर्थ.

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा न्यन्यानि संयाति नवानि देही॥२२॥

पण जन्म-मृत्यु होतो असेच जर समजत असशील तरी ते अटळ आहे. ही सुखदुःखे इंद्रियजन्य आणि अनित्य असतात. ती सहन कर. त्याचे दुःख नको.

भगवंतानी ४० श्लोकापर्यंत सांख्ययोग सांगितला आहे. म्हणजेच सांख्य मार्गातले ज्ञान, आत्मतत्व विवेचन, आत्मतत्वाची अखंडता व देहाची क्षुद्रता समजणे कठीण नाही. त्यानंतर कर्मबंधातून सुटण्यासाठी ज्ञानयोग सांगितला आहे. योग म्हणजे समत्व. कर्म महत्वाचे. फल महत्त्वाचे नाही. पण वेदात स्वर्गसुख प्राप्तीसाठी यज्ञ याग सांगितले आहेत. त्याने भोगेश्वर्य प्राप्त होते.

पण श्रीकृष्णास हे मान्य नाही. हा कसला कर्मयोग! ज्यांना भोगश्वर्याची ओढ त्यांना शांती कुठली? समाधान कुठले ? अर्जुना तू त्रिगुणातीत, द्वन्दातीत, सात्त्विक गुणांनी संपन्न व योगक्षेमादी स्वार्थात लिप्त न होता ' 'आत्मनिष्ठ' असा हो. वेदांचा विषय त्रिगुणात्मक सृष्टी हा आहे. वेद ज्ञानपूर्ण असेल तरी सारीच तत्त्वे स्वीकारु नयेत. वेदांतून कर्मप्रेरणा स्वीकार पण 'फलासक्ती' (स्वर्गप्राप्तीची कामना) स्वीकारु नकोस. हे बघ, समत्व बुद्धी म्हणजे योग. फल प्राप्त होवो न होवो त्याची आसक्ती न ठेवता कर्म कर. कर्म महत्त्वाचे नाही ही वृत्ती महत्त्वाची. ही समवृत्ती कर्मात असणे म्हणजे कर्मयोग. या वृत्तीनेच मोक्षपद प्राप्त होते.

यावर अर्जुनाचा प्रश्न ही स्थिर बुद्धी वा समत्व बुद्धी कशी असते ? स्थितप्रज्ञ कसा असतो ? तो कसा बोलतो, कसा राहतो ? कसा वागतो ? थोडक्यात समाधी कशी असते ते मला सांग.

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्॥

या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी ५४ ते ७२ स्थितप्रज्ञाची लक्षणे भगवंतानी सांगितली आहेत. अर्जुना त्यालाच स्थितप्रज्ञ म्हणतात जो सर्व वासना टाकून आपल्याच आत्मानंदात संतुष्ट समाधानी राहतो. म्हणजे दुःखाने खचत नाही व सुखाने हरखून जात नाही. प्रेम, भय, क्रोध ही ज्याची सुटली तोच खरा स्थितप्रज्ञ मुनी म्हणायचा. आपले जीवन शरीर केंद्रीत न होऊ देता आत्मकेंद्री ठेवावे. शरीर हे वरचे वस्त्र. खरा 'मी' आत आहे. (आत्मा) हा व्यापक दृष्टिकोन. मग दुःखही नाही मोहही नाही.

सुख-दुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।
ततो युद्धाय युज्यस्व नैनं पापमवाप्स्यसि॥ ३८॥

सुख-दुःख, लाभ-हानी आणि जय-पराजय सारखेच समजून (स्थिरबुद्धी ठेवून) युद्धाला तयार हो. असे केल्याने तुला पाप लागणार नाही. आणखी हे लक्षात घे की कर्मावर तुझा अधिकार आहे पण कर्मफळावर नाही. म्हणून तू कर्माचे अमुकच फळ मिळावे असा हेतू मनात ठेवून कर्मे करू नकोस. आणि कर्मे न करण्याचेही ठरवू नकोस. कर्मफलाची आसक्ती न बाळगता, यशापयशाविषयी समबुद्धी ठेवून योगमुक्त होऊन योग कर्मेच कर. अशा समत्व बुद्धीलाच योग म्हणतात. या वृत्तीनेच मोक्ष (ब्रह्मपद) प्राप्त होतो.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि॥ ४७॥

गीतेत तीन सिद्धान्त सांगितले आहेत.

१) आत्म्याचे अमरत्व

२) मृत्यू नसतोच असते ते परिवर्तन

३) परिवर्तन अटळ (विनाश नाही)




**निसर्गाचे परिवर्तन चक्र**




**हे देहाचे परिवर्तन चक्र**

तरीही देह बुद्धीच्या कोंडीत सापडून आपण तऱ्हेतऱ्हेची डबकी निर्माण करतो. स्वधर्माच्या मार्गात काटे परसरवणाऱ्या मोहाची बाहारुपे असंख्य आहेत. या सर्वांच्या मुळाशी असलेली संकुचित आणि उथळ देहबुद्धी. 'मी' आणि 'माझे' माझ्या शरीरासंबंधाची माणसे एवढीच माझी व्याप्ती. त्यांचेही तो देहबुद्धी शरीरच पाहते.

'मामकाः पाण्डवा श्चैव' पहिल्या अध्यायाच्या सुरुवातीच्या श्लोकात धृतराष्ट्र म्हणतो 'माझी' मुले, अर्जुनही सारखे 'मी' युद्ध करणार नाही. स्वजनांना मारून 'मला' पाप लागेल. रक्तलांच्छित राज्यभोग 'मला' कोणते सुख देणार ? त्या भोगांची 'मला' इच्छा नाही. त्याने 'माझ्या' कुलाचा क्षय होईल. असे 'मी', 'माझे', 'मला' एवढ्या संकुचित व्यक्तिगत 'अहंम' च्या दृष्टकोनातून पाहतो, विचार करतो.

भगवंताला सांगयाचे आहे. ह्या देहबुद्धीच्या डबक्यातून बाहेर ये. संकुचित, स्वार्थी दृष्टीकोन न ठेवता विशाल व्यापक दृष्टीकोन ठेव. सारखं मी-माझे-मला काय ? व्यक्तिगत विचार न करता समाजाचा राष्ट्राचा विचार करायला हवा. स्वतःचा विचार न करता समष्टीचा विचार हवा.

'मी' हून व्यापक 'कुटुंब', मग 'शेजारी', मग 'समाज', मग 'गाव', मग 'राष्ट्र', मग 'विश्व' हे विश्वचि माझे घर' असा विशाल-व्यापक दृष्टिकोन हवा. देहाचा 'परिघ' वाढवला की एकच एक आमतत्व. देहाचे 'कुंपण' तोडले की सर्व समस्या संपतील. प्रत्येकाने दुसऱ्याच्या सुखाचा विचार केला तर दुःखच राहणार नाही.

'दुसऱ्यांना सुखविण्यात आहे जीवनात आनंद खरा' हेच वचनापिबान्ति नद्या स्वयमेव नांभा- फलानि वृक्षा।

नादन्ति सस्यं खलु वारिवाहा परोपकाराय सताय् विभुतया॥

जो तो दुसऱ्यासाठी झटतो तो जगतो. असे झाल्यास मग आणखी काय हवे !

तुम्हाला 'मदर इंडिया' सिनेमातले एक उदाहरण सांगते. त्यात गावची इज्जत महत्त्वाची मानून ती वाचवण्यासाठी आई स्वतःच्या मुलालाच (गावची इज्जत लूटणाऱ्या) गोळी घालते. व्यक्तिगत दुःखापेक्षा ती गावाची 'इज्जत' राखणे 'स्वधर्म' स्वकर्तव्य कर्म मानते. स्वतःचा स्वार्थी विचार न करता समष्टीचा विचार करते. ती आई आठवा.

इतिहासातली स्वामीनिष्ठ आठवा. राष्ट्राच्या हितासाठी राजपुत्राला वाचवून तिथे मरणाच्या दारात स्वतःचाच मुलाला ठेवणारी. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' हे किंवा असेच राष्ट्र हितासाठी प्राणार्पण करणारे देशभक्त. ही उदाहरणे ही 'स्व' चा विचार न करता समष्टीचाच विचार करणारीच आहेत.

भगवंत अर्जुनाला म्हणतो आहे. व्यक्तिगत लाभ हानी, जय-पराजय, पाप-पुण्य याचा विचार न करता प्रजेच्या हितासाठी युद्धाला तयार हो.

'परित्राणाय साधुनां विनाशायच दृष्कृताय' साधुसज्जनाचं रक्षण करण्यासाठी व दुष्टाचं निर्दालन करणं हे तुझ्यासारख्या क्षत्रियाचं आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी युद्ध करणं हा तुझा 'स्वधर्म' आहे. तो तू पाळायलाच हवा. म्हणून तुला युद्ध केलेच पाहिजेस तेच श्रेयस्कर आहे.

भावनेच्या आहारी जाऊन हे धर्मयुद्ध टाळू पाहशील तर स्वधर्माचा नाश करशील व तुला पाप लागेल. जय-पराजय दोन्हीही क्षत्रियाला लाभदायकच.

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम।
तस्मादुत्तिष्ठ कौतेय युद्धाय कृतनिश्चयः॥ ३७॥

मेलास युद्धात तर स्वर्ग, जिंकलास तर पृथ्वीचे राज्य. म्हणून उठ आणि युद्धाला सामोरा जा. कारण तोच तुझा स्वधर्म ! स्वधर्म म्हणजे कर्तव्य ! हा स्वधर्म प्रत्येकाचा वेगळा असतो. राजाचा धर्म वेगळा, प्रजेचा वेगळा, माता पित्यांचा वेगळा, पुत्राचा वेगळा, सैनिकाचा वेगळा, सैनिक कठोर शस्त्रधारी तर शिक्षक प्रेमळ. ज्ञानी विचारवंत सैनिकाला हिंसा अटळ तर शिक्षकाला अयोग्य. त्यामुळे कोणताही धर्म श्रेष्ठ कर्तव्य. प्रत्येकाने आपापलाच स्वधर्म पाळावा. आपला चांगला दुसऱ्याचा वाईट असेही नाही. तसेच दुसऱ्याचा धर्म चांगला म्हणून तो स्वीकारणेही गैरच. स्वधर्म आचरावा व परधर्मा बद्दल आदर ठेवावा.

'स्वधर्म' ज्याचा त्याचा जन्मा अगोदरच ठरतो. तो आपल्याला शोधावा लागत नाही. 'स्वधर्म' आईसारखा आहे. 'आई' ज्याला त्याला जन्माबरोबर मिळते. ती कशी असेल तशी स्वीकारणे हाच मुलाचा धर्म, तसाच स्वधर्म आपल्या जन्माबरोबरच जन्मतो किंवा आधीच कारण तोच आपल्या जन्माचा हेतू असतो. तो पार पाडण्यासाठीच आपला जन्म असतो. म्हणून स्वधर्म हा सहज प्राप्त व आवश्यक अनिवार्य आहे आहे. हे बिनोबाजींनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे.

या स्वधर्माचरणासाठी देहाला जगवले पाहिजे, सांभाळले पाहिजे. त्याला खायला प्यायला दिले पाहिजे.

पण त्याने अमुकच हवे असे म्हणता कामा नये. विनोबाजी म्हणतात पळीला पिठल्यात बुडवा वा श्रीखंडात बुडवा तिला काहीच सुख दुःख, आवड-निवड नसते. देहासक्ती जाईल तेव्हाच देह सेवेचे साधन होईल. तोपर्यंत आम्ही देहाचे पुजारी देह पूजेत धन्यता, इतिकर्तव्यता मानणार. देह सेवेसाठी वापरला तर मूळचा क्षुद्र देह श्रेष्ठ पदाला पोचू शकतो हे आम्हाला कधी कळणार ? ती उंची आम्ही कधी गाठणार ?

आत्म्याला मुक्तानंद हवा आहे. पण आम्हीच त्याला देहात कोंडले आहे. त्याला 'विश्वची माझे घर' म्हणून विश्वाला मिठीत घ्यायचे आहे. पण आम्ही 'देहची माझे घर' म्हणून त्याला बंदिवान करून ठेवले आहे. आत्मा एक अखंड झरा आहे त्यावर अनेक देह येतात जातात. मग देहसंबंधी तेवढेच माझे काय म्हणतोस ? आणि देहाच्या मृत्यूबद्दल शोक करतोस ? जुना फाटतो म्हणून दुसरा घेता येतो. एकच एक देह जर आत्म्याला कायमचा चिकटून राहता तर आत्म्याची धडगत नव्हती. मग सारा विकास थांबला असता, आनंद लोपला असता व ज्ञान काळवंडले असते. म्हणून देहाचा नाश ही शोचनीय गोष्ट नाही. एका अर्थाने मृत्यू हे प्राणीमात्रांना, जडजीवांना वरदानच आहे.

म्हणून नित्य सत्वगुणात स्थिरबुद्धीने राहिलास तर आत्मज्ञानी होशील कर्मयोगी होशील. स्वधर्म कर्तव्य बुद्धीने, निष्कामपणे, समत्व राखून केले नाहीस तर जन्म-मृत्यूची येरझार अटळ. म्हणून स्थिरबुद्धीने वाग.

स्थिरबुद्धी स्थितप्रज्ञाची सोपी व्याख्या तुला सांगतो, ज्याला इंद्रिये वश आहेत. ज्याचा इंद्रियावर ताबा आहे असा, कासव जसे योग्यवेळी आपली इंद्रिये ओढून घेते व बाहेर काढते तशी इंद्रिये स्वाधीन असायला हवीत. विद्वान पुरुष कितीही निग्रह करीत असला तरी त्याची आडदांड इंद्रिये त्याचे मन जबरदस्तीने ओढून भलतीकडे नेतात. म्हणून इंद्रियांचे दमन करून, रोगमुक्त होऊन माझ्यापाशी मन स्थिर करावे. ज्याची इंद्रिये स्वाधीन त्याची बुद्धी स्थिर. वारा होडीला पाण्यात खेचून नेतो तसे इंद्रिये बुद्धीला विषयात बुडवतात.

हा गहन विषय सोपा करण्यासाठी रामकृष्ण परमहंसांनी शिष्यांना सांगितलेली गोष्ट सांगते. एकदा लहान मुलगा वडिलांबरोबर रस्त्याने चालला होता. समोरून चार शिपाई एका माणसाला मधोमध ठेवून चालले होते. मुलगा म्हणाला 'बाबा हे कोण आहेत ?' बाबा म्हणाले, 'तो मधला चोर आहे व शिपाई त्याला पकडून नेत आहेत, थोडे पुढे गेल्यावर पुन्हा तसेच दृश्य दिसले तेव्हा मुलगा ओरडला बाबा तो पहा चोर'. बाबा म्हणाले, 'तो चोर नाही. तो राजा आहे व बाकीचे त्याचे सेवक आहेत.!' मुलगा म्हणाला,' असे कसे ? मध्ये माणूस व भोवती शिपाई असेच तर आहे.' बाबा म्हणाले ,' दृश्य तसेच असले तरी त्यात फरक आहे. मघाशी शिपायांच्या ताब्यात चोर होता, आता राजाच्या ताब्यात शिपाई आहेत.'

यावरून जर इंद्रियांच्या ताब्यात आपण जाऊ तर चोर ठरू व आपलाया ताब्यात इंद्रिये ठेवू तर राजा होऊ. काय व्हायचे ते आपण ठरवायचे. हा ताबा घेण्यासाठी संयम हवा, मनानं तृप्त असायला हवं. तृप्तता समुद्रासारखी हवी. नद्या अखंड पाणी आणून ओततात तरी समुद्र आपली मर्यादा सोडत नाही.

एकदा बुद्धी आत्म्यावर स्थिर झाली की इंद्रिये विषयात वावरली तरी ती तेथे रमत नाहीत. त्यामुळे प्रसन्नता लाभते मनुष्य स्थितप्रज्ञ होतो. मग तो इंद्रियसुखात न रमता आत्मसुखात रमतो.

बुद्धी आत्म्याशी जोडली गेली की मन ताब्यात राहते. इंद्रिये-मन-बुद्धी-आत्मा अशा चढत्या पायऱ्या आहेत. जर तीच बुद्धी मनाशी जोडली गेली तर मन इंद्रियांशी जोडलेले असल्याने बुद्धी भ्रष्ट होते.

'मग बुद्धी आत्म्याशी कशी जोडायची ?' ते तू मला सांग. 'निर्णय (आसक्ती रहीत), निरहंकार होऊन,

कर्तव्य म्हणून एखाद्या घटनेकडे, गोष्टीकडे पाहायचे. मग ती सुखकारक असो वा नसो, तिथे 'मी' ला डोकावू न देणेच इष्ट असे होणे म्हणजे बुद्धी आत्म्याशी जोडणे. अहम शून्यतेत आत्मदर्शन होते.

लोकमान्य, टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे व तो मिळवीनच म्हटले पण तिथे 'मी' ने स्वधर्म कर्तव्य कर्म शिकस्तीने पार पाडले. पण ते माझ्यासाठी' मिळवले नव्हते. तर राष्ट्रासाठी. निष्काम बुद्धीने. स्वा. सावरकर हेही असेच कर्मयोगी.

पुंडलिक, तुकाराम, रविंद्रनाथ, कलावती देवी अशीच कर्मयोग्यांची उदाहरणे.

आत्मदर्शनाने व्यक्तिगत कामनांनी, भावनांनी बुद्धी कंपित होत नाही. बुद्धीची ही स्थिरता व निष्कलंकता तिला 'समाधी' म्हणतात. ज्याची अशी समाधी लागते तो विश्वाशी तादात्म्य पावून विश्वात वावरतो. दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी १८ श्लोकात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत. स्थितप्रज्ञ हा गीतेचा आदर्श आहे. पाचव्यात जीवन मुक्ताचे, बाराव्यात भक्ताचे, चौदाव्यात गुणातीताचे आणि अठराव्यात ज्ञाननिष्ठाचे वर्णन आलेले आहे.

१) आत्म्याची अमरता २) देहाची क्षुद्रता ३) स्वधर्माची आवश्यकता अनिवार्यता. हे सांगून शेवटी या सर्वांचे फलित 'ब्रह्मप्राप्ती' सांगितली आहे. सकळ कर्माच्या माध्यमातून अहमभावाची आहुती देणे हाच परमात्म्यासाठी केलेला यज्ञ आहे.

ज्ञान योगाने - विचार सुधारतील<br>
ध्यानयोगाने - मनोवृत्ती सुधारतील<br>
कर्मयोगाने - वर्तनात बदल होतील

सामान्यांची वृत्ती -कर्म केले तर फळ हवेच. (रजो गुणी) फळ मिळणार नसेल तर कर्म करणे नाही. (तमोगुणी) पण गीता सांगते -कर्म कराच, फळाचा त्याग करा. (सत्वगुणी) फळ निरपेक्ष कर्मातील तन्मयता समाधीच्या कोटीची. पुंडलिकाची माता पित्याची निरपेक्षा सेवा ह्या स्वधर्म कर्मातील तन्मयता याच कोटीची नाही का ? किंवा श्रावण बाळाची निरपेक्षपणे मातापित्याची सेवा हे पण स्वधर्म कर्मातील तन्मयतेच उदाहरण म्हणावे लागेल.

महाभारतातील सर्व पात्रे ही सार्वकालिक आहेत. अर्जुन-नायक, दुर्योधन-खलनायक. सुष्ट दुष्टांची भाऊबंदकी आजही आहेच. द्रौपदी-ही नायिका. 'स्त्री' ची विटंबना आजही आहेच. जयवाला आशर, रिंकू पाटील, दर्शना ह्या स्त्रियांवर अत्याचार होताना लोकांनी भीष्म, द्रोणांसारखीच बघ्याची भूमिका केली. धृतराष्ट्रसारखे ज्ञान चक्षू व अंतर्चक्षुंनी आंधळेही आज आहेत.

खलांना शासन करणारे अनेक अर्जुन आज निर्माण व्हायला हवेत. तसेच त्यांना मार्ग दर्शन करणारा कृष्णही हवा आहे. भगवान शंकर पार्वतीला म्हणतात तुझ्या नित्य नूतन रुपाप्रमाणेच 'गीता' आहे सदा नित्यनूतन.

सांख्य मार्ग चैतन्याचा, आत्मतत्वाचा शोध घेणारा तर कर्ममार्ग प्रकृती तत्त्वाचे, विश्वाचे चिंतन करणारा. या दोन्ही गुणांचा समन्वय हा गीतेचा मार्ग

कर्म खा, कर्मच प्या, कर्म पचवा, कर्म करणे यात सारे काही आले. हाच गीतेचा संदेश.

या अध्यायाच्या अखेरीस जाता जाता, साधकाने कधीही निराश न होता युक्ती कमी पडेल तिथे भक्तीची जोड द्यावी अशी अत्यंत मोलाची सूचना स्थितप्रज्ञाच्या लक्षणात भगवंतानी देऊन ठेवली आहे.

**आशा भिडे**<br>
बी/९, विजय अपार्टमेंटस् 'आराधना' टॉकीज जवळ<br>
ठाणे (प), ४०० ६०२ फोन: ५४१०१४०

•••

# आपल्या देशात खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालये का नाहीत ?

*आपल्या देशात खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालये नाहीत, त्या मागे कोणती कारणे आहेत याचा या शोधनिबंधात वेध घेतला आहे. - संपादक*

**प्रस्तावना :-**

वाचल तर वाचाल. वाचन हे प्रत्येक व्यक्ती करिता दररोज चे अन्न ग्रहना इतकेच महत्वाचे आहे. वाचनामुळे मानसिक उदासीनता नाहिशी होऊन जीवन सुखकर होण्यास मदत होते. चांगल्या प्रकारचे वाङ्मय वाचल्याने बौद्धिक भावनिक भूक भागते. वाचनापासून मिळणारा आनंद न भूतो भविष्यती असा असतो. भरपूर व विविधांगी वाचनामुळे विचारात प्रगल्भता आल्याने संकुचितवृत्ती लोप पावून वैयक्तिक जीवन सुखकर होण्यास मदत मिळते. विषयाचे आकलन स्पष्ट झाल्याने गुंतागुंतीचे प्रश्न सहज सुलभ होतात.

वाचनामुळे वागणुक सुसंस्कृत होत असल्याने समाज सुद्धा सुसंस्कृत होतो. '' ज्याला चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याला करमणुकीला सीमा नाही.'' गोपाळ गणेश आगरकराचे हे वाक्य अत्यंत यथार्थ आहे. कै. विष्णुपंत चिपळूणकरांनी वाचनाचे फायदे विषद करतांना '' वाचनाचा पहिला मोठा उपयोग म्हणजे त्याच्या योगाने चित्ताचे रंजन होऊन दुसऱ्या करमणुकीच्या उपयांची गरज रहात नाही. खरा रसिक व विद्वान हा आपल्या पुस्तकालयात बसून ग्रंथवाचन निमग्न झाला असता त्यास त्या वेळेस जे सुख मिळत असेल ते सार्वभौम राज्यास भर राजदरबारात राजसिंहासनावर बसल्या नंतर ही मिळत नसेल.'' भोजन जसे सावकाश व नेमस्तपणे व नियमाने केले असता अंगी लागून शरीरास हितावह होते त्याच प्रमाणे वाचन मन लावून व लक्ष पूर्वक केले असता त्या पासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ती वृद्धिंगत होतात. '' स्वर्गापेक्षा मी चांगल्या पुस्तकांचे अधिक स्वागत करीन. कारण पुस्तक जेथे असेल तेथे स्वर्ग निर्माण होतो'' लोकमान्य टिळकांचे वाचनाचे महत्त्व व वाचनसुखाचा आनंद मिळवुन देणारे महात्म सांगणारे हे उद्‌गार यथार्थ वाटतात.

वाचकांमध्ये ग्रंथाबाबत प्रेम आपुलकी निर्माण करण्याकरिता आणि वाचन संस्कृतीची वाढ करण्याकरिता वाचकांना ग्रंथ सहज सुलभ उपलब्ध करून देण्याचे व त्यांच्यातील वाचनाची आवड वृद्धींगत करण्याचे काम ग्रंथालये करीत असतात. ग्रंथ किंमतीत झालेल्या प्रचंड वाढीमुळे वैयक्तिकरित्या ग्रंथ खरेदी करणे आर्थिक दृष्टीने परवडणारे नसल्याने वैयक्तिक ग्रंथ खरेदी होत नाही. माहितीच्या प्रचंड विस्फोटामुळे आज मिळालेली माहिती उद्या कालबाह्य होते. या करिता ग्रंथालये ही मध्यस्थाची भूमिका घेऊन वाचकांना आवश्यक असलेली ग्रंथ, माहिती सहज उपलब्ध करून देतात. एकदा वाचनाची गोडी लागली की वाचकांच्या वाचनाच्या आवडी वाढू लागतात. जसे जसे अधिक वाचन वाढेल तशी विषयाची जिज्ञासा वाढत जाते. वाचक अधिकाधिक वाचन साहित्याचा आस्वाद घेऊ लागतो. वाचकाला त्याच्या आवश्यकते नुसार अलग अलग वेळेला अलग अलग विषयांचे ग्रंथ माहिती आवश्यक असते. माहिती विस्फोटामुळे एकाच ग्रंथालयाला सर्व प्रकारची ग्रंथ संपदा उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. त्यामुळे आवश्यकते नुसार व कार्यपद्धती नुसार ग्रंथालयांचे प्रकार पाडण्यात आलेत.

१) राष्ट्रीय ग्रंथालये.

२) सार्वजनिक ग्रंथालये.

३) शैक्षणिक ग्रंथालये.

४) विशेष ग्रंथालये.

वाचकांच्या माहिती मिळविण्याचे आवश्यकतेनुसार या ग्रंथालयांचा वापर वाचक करीत असतो. शैक्षणिक जीवनात साथ देणाऱ्या या ग्रंथालयांचा वापर वाचक शैक्षणिक जिवनाचे समाप्ती नंतर या ग्रंथालयांचे सभासदत्व मर्यादेमुळे चालू ठेवू शकत नाही. या अडचणीवर मात करण्याकरिता या समाजाचे सर्व घटकांकरिता मुक्तसभासदत्व असलेले सार्वजनिक वाचनालयांची गरज निर्माण होऊन सार्वजनिक वाचनालयांचा प्रारंभ झाला.

**सार्वजनिक वाचनालय. व्याख्या :-**

युनेस्कोचे व्याख्ये प्रमाणे सार्वजनिक ग्रंथालये म्हणजे -

१) ज्या ग्रंथालयाची स्थापना कायद्याप्रमाणे करण्यात आलेली आहे.

२) ज्या ग्रंथालयाचा खर्च शासकीय कोषातून करण्यात येतो.

३) ज्या ग्रंथालयाच्या सेवे बाबत कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

४) जी ग्रंथालये समाजातील कोणत्याही व्यक्ती समूहा करिता खुली आहे.

**सार्वजनिक ग्रंथालयाची वैशिष्ट्ये :-**

वरील व्याख्येवरून सार्वजनिक वाचनालयांची वैशिष्ट्ये, खालील प्रमाणे लक्षात येतात.

१) कायद्यान्वये स्थापित

२) नि:शुल्क सेवा.

३) सार्वजनिक निधितून आर्थिक संचालन.

४) सहाय्यक शैक्षणिक संस्थाचे स्वरूप

५) सूचना व माहिती केन्द्राचे स्वरूप

६) स्वयं शिक्षण केन्द्र

७) स्थानिक संस्कृती केन्द्र.

**१) कायद्यान्वये स्थापित संस्था :-**

स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासन यांनी पारित केलेल्या ग्रंथालय कायद्यान्वये या ग्रंथालयांची स्थापना करण्यात येत असल्याने या संस्थांना कायद्याचे अधिष्ठान असते. त्यामुळे स्वयंसेवी संस्थाच्या स्वरूपात या संस्था कार्य करित असतात. महाराष्ट्रात सर्व सार्वजनिक वाचनालये ही महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ व नियम १९७० अंतर्गत संचालित करण्यात येतात. तर ग्रंथालयांची नोंदणी मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व केन्द्र शासनाच्या संस्था नोंदणी अधिनियम १९६० या दोनही कायद्या प्रमाणे करण्यात येते.

**२) नि:शुल्क सेवा :-**

या ग्रंथालयांचे स्वरूप सार्वजनिक असल्याने व शासनाद्वारे गोळा करण्यात येणाऱ्या करातून अनुदानाचे स्वरूपात या ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य मिळत असल्याने ही ग्रंथालये वाचकांना ग्रंथालयाच्या परिसरात व घरी वाचनाकरिता वाचनीय साहित्य उपलब्ध करण्या सोबतच त्यांचे मनोरंजन व वाचनाची आवड वाढी करिता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन नि:शुल्क करतात. काही ग्रंथालये विशेष सेवा प्रदान करून काही शुल्क आकारतात.

**३) सार्वजनिक निधितून आर्थिक संचालन :-**

सार्वजनिक ग्रंथालयांना शासनाकडून आर्थिक अनुदानाचे स्वरूपात आर्थिक मदत मिळत असल्याने अप्रत्यक्षरित्या सर्व सामान्यांच्या करातून म्हणजेच

सार्वजनिक निधितून या वाचनालयांचे आर्थिक संचालन होत असते. शासन कर दात्यांवर जी विविध करांची आकारणी करते त्यातून काही ठराविक रक्कम या ग्रंथालयांना आर्थिक मदत देत असते. महाराष्ट्रात सुद्धा ग्रंथालय कायदा मंजूर करतांना ही रक्कम २५ लक्ष रुपये ठरविण्यात आली व नंतर त्या मध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आली.

या शासकीय मदती शिवाय समाजातील दानशूर व्यक्ती या संस्थाना वेळोवेळी विशिष्ट कारणाकरिता अशा संस्थांना देणग्या देऊन मदत करीत असतात.

## ४) साहाय्यक शैक्षणिक संस्थांचे स्वरूप :-

शिक्षणाच्या प्रसार प्रचाराबरोबर अनेक शैक्षणिक संस्था स्थापन झाल्यात या संस्थांमध्ये इतर सुखसोयी बरोबर सुसज्ज ग्रंथालये स्थापित झालीत. या ग्रंथालयांचा वापर करण्याची मुभा फक्त संबंधित संस्थेत शिक्षण घेत असतांनाच देण्यात येते. शैक्षणिक कालावधी समाप्ती नंतर या ग्रंथालयांचा ऊपयोग सर्व सामान्यांना घेता येत नाही. म्हणजेच या ग्रंथालयांचे सभासदत्व मर्यादित असते. त्यामुळे सर्व सामान्यांकरिता सार्वजनिक वाचनालय हेच एकमेव ग्रंथालय सहाय्यक होते. सार्वजनिक वाचनालय वाचकांच्या आवडी निवडीवर विशेष लक्ष पुरवीत असल्याने अपारंपारीक शिक्षण संस्थेच्या रुपात कार्य करतात.

## ५) सूचना व माहिती केन्द्राचे स्वरूप :-

युनेस्कोच्या परिभाषेत नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालये आपल्या वाचकांकरिता विभिन्न वाचन अभिरूची प्रमाणे प्रथम संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून देत असल्याने मिळालेली माहिती विश्वासनीय अशी राहते. त्याबरोबर शासकीय योजनांची माहिती सर्व सामान्या करीता उपलब्ध करून देत असते.

## ६) स्वयं शिक्षण केन्द्र :-

पारंपरिक शैक्षणिक संस्था प्रमाणे या ग्रंथालयात मार्गदर्शक उपलब्ध नसल्याने वाचकाला आवश्यक माहिती स्वत:च शोधावी लागते या प्रमाणे स्वयं शिक्षणाकडे या ग्रंथालयांमध्ये विशेष भर राहतो.

## ७) स्थानिक सांस्कृतिक केन्द्र :-

सार्वजनिक वाचनालयांची ग्रंथ निवड करतांना स्थानिक गरजा लक्षात घेऊन, स्थानिक लेखक, स्थानिक लोककला, इतिहास, आर्थिक बाबी याकडे विशेष लक्ष दिल्या जात असल्याने स्थानिक संस्कृतीचे यथार्थ दर्शन घडते. त्याच बरोबर सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा स्थानिक कलावंतांना वाव मिळतो.

## ८) ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

सार्वजनिक वाचनालयांची सर्व प्रथम स्थापना १४ ऑगस्ट १८५० मध्ये ग्रंथालय अधिनियम अस्तित्वात येऊन इंग्लंड, अमेरिकेत हाऊस ऑफ कॉमन मध्ये कायदा मंजूर करून झाली. यापूर्वी ग्रंथालयांचा वापर फक्त धर्मप्रसारा करिताच होत असे. भारतात सार्वजनिक ग्रंथालयांची परंपरा अतीप्राचिन बौद्धकाळा पासून आहे. विक्रमशाळा, मिथिला, उज्जैन, नालंदा येथे अतिप्राचीन काळात सार्वजनिक ग्रंथालये अस्तित्वात भारतात सर्व प्रथम कलकत्ता लायब्ररी सोसायटीची आधुनिक रूपात स्थापना झाली. १८३० मध्ये बॉम्बे जनरल लायब्ररीची स्थापना झाली. इम्पीरियल लायब्ररी कलकत्ता १८४९ . १९२५ मध्ये सर्वप्रथम एक ग्रंथालय ट्रेनिंग कोर्स चालू झाला. याच वर्षी अखिल भारतीय ग्रंथालय संघ (ILA) स्थापन झाला. १९१० मध्ये बडोदा संस्थानाते ग्रंथालय चळवळीचा प्रारंभ झाला यात जिल्हास्तर, तालुकास्तर नगर व स्थानिक स्तरावर ग्रंथालये स्थापनेची कल्पना होती. ग्रंथालय सेवा नि:शुल्क प्रदान केल्या जात असत. १९१५ मध्ये सर्वप्रथम

लायब्ररी मिसलेनी नावाने प्रथम ग्रंथालय विज्ञान पत्रिका प्रकाशित झाली. १९१५ मध्ये पंजाबमध्ये चळवळीला सुरुवात झाली १९१८ मध्ये प्रथम अखिल भारतीय ग्रंथालय सम्मेलन लाहोर येथे भरविण्यात आले.

१९५१ मध्ये भारत सरकार व युनेस्को यांच्या सहयोगाने दिल्ली पब्लिक लायब्ररीची स्थापना झाली. १९५५ मध्ये दिल्लीमध्ये अंतरराष्ट्रीय ग्रंथालय संमेलन आयोजित करण्यात आले. याच वर्षी ग्रंथालयांशी संबंधित बऱ्याच तज्ज्ञांना प्रथमच प्रशिक्षणाकरिता ग्रंथालय संघाची स्थापना झाली. आंध्रप्रदेश मध्ये १९१४, बंगालमध्ये १९२९, मद्रास १९२८, पंजाब १९२९, मुंबई १९४४, केरळ १९४२, हैद्राबाद व दिल्ली १९५३, बिहार १९५६, उ.प्र. १९५६, मध्यप्रदेश १९५७ मध्ये ग्रंथालय संघ स्थापित झाले.

पंचवार्षिक योजना बनवून सार्वजनिक वाचनालयांचा विकास करण्याचे प्रयत्न करण्यात आले. १९५१ ते १९५६ या पहिल्या पंचवार्षिक योजनेत ९ राज्य ग्रंथालये स्थापित करण्यात आलीत.

१९५६-६१ या दुसऱ्या योजना काळात ग्रंथालय विस्तारावर १४० लक्ष रूपये मंजूर करण्यात आले.

१९६१-६६ तृतीय योजनाकाळात १ केन्द्रीय, २२ राज्य, १५४ जिल्हा, ७१० तालूका, ४५०० ग्रामीण ग्रंथालये स्थापित करण्यात आलीत. १९६६ मध्ये केन्द्रीय शिक्षण मंत्रालया अंतर्गत ग्रंथालय परिषद स्थापन करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रंथालय चळवळीला चालना मिळाली.

१) इम्पिरीयल लायब्ररीचे राष्ट्रीय ग्रंथालयात रूपांतर

२) राष्ट्रीय ग्रंथसूची आय. एन.बी. बी निर्मिती

३) प्रत्येक राज्यात स्टेट लायब्ररी

४) केन्द्रीय ग्रंथालयाची स्थापना

५) राष्ट्रीय ग्रंथालय परामर्श समिती चे गठन

६) जिल्हा ग्रंथालय, ग्राम ग्रंथालये स्थापना

७) डिलीव्हरी ऑफ बुक्स एक्ट लागू

८) राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची स्थापना

इत्यादी महत्त्वपूर्ण संस्था सार्वजनिक विकासाच्या करिता संघटित करण्यात येऊन ग्रंथालय चळवळीला शास्त्रीय चळवळ बनविण्याचे प्रयत्न झाले.

**ग्रंथालय अधिनियम :**

भारतात शिक्षण हा विषय राज्यांच्या सूचीत समाविष्ट असल्याने ग्रंथालयासंबंधी फक्त केन्द्राने कायदे करून चालत नाही तर राज्यसरकारने सुद्धा या संबंधी कायदे करणे आवश्यक आहे.

भारतात सर्व प्रथम १९४२ मध्ये डॉ. अेस्. आर्. रंगनाथन यांचे प्रयत्नाने ग्रंथालय कायदा त्यावेळचे कोल्हापूर राज्यात लागू करण्यात आला. १९४८ साली स्वतंत्र भारतातील पहिला ग्रंथालय कायदा मद्रास राज्यात डॉ. रंगनाथन यांच्या प्रयत्नाने लागू करण्यात आला. जो आज सुद्धा तेथे लागू आहे. त्या नंतर ११ राज्य सरकारांनी ग्रंथालय कायदा लागू केला.

(१) मद्रास १९४८ (२) आंध्र प्रदेश १९६० (३) कर्नाटक १९६५ (४) महाराष्ट्र १९६७ (५) पश्चिम बंगाल १९७९ (६) मणिपुर १९८८ (७) केरळ १९८९ (८) हरियाणा १९८९ (९) गोवा १९९३ (११) मिझोराम १९९३ (११) पान्डेचरी १९९६.

या कायद्यांची आपली आपली स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. या कायद्यांमुळे भारतात सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला चांगले दिवस आलेत.

वरील सर्व प्रयत्नामुळे ग्रंथालये वाळसे धरू लागली तरी पाहिजे त्या प्रमाणात या चळवळीचे प्रगती झालेली नाही.

**सार्वजनिक वाचनालये खऱ्या अर्थाने सार्वजनिक झाली नाहीत. कारण :-**

१) वाचन संस्कृतीचा अभाव.

२) शासनाची उदासीनता.

३) सार्वजनिक ग्रंथालयांची उपेक्षा.

४) वाचन साहित्याचे व्यापारी करण.

**१) वाचन संस्कृतीचा अभाव :-**

युनेस्कोच्या १० कलमी ग्रंथालय सनदेत नमुना मार्गदर्शक सूत्राप्रमाणे भारतात बहुतंश राज्यांनी ग्रंथालय कायदे करून सुद्धा जो पर्यंत सर्व सामान्य जनतेमध्ये वाचनाची आवड वाढीला लागत नाही तो पर्यंत सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या तरी जो पर्यंत ग्रंथालयाचा महत्वाचा घटक वाचक ज्याच्या सोयी करिता ही ग्रंथालये उघडली गेलीत तो जो पर्यंत योग्य रीतीने यांचा वापर करीत नाही तो पर्यंत ही ग्रंथालये उपेक्षित राहणार आहेत. भारतात वाचनाची आवड कमी होण्याची अनेक कारणे आहेत.

१) निरक्षरता

२) गरिबी, दारिद्र्य

३) कौटुंबिक वातावरण

४) सामाजिक स्थिती

५) शैक्षणिक संस्थाची अनास्था

वरील कारणांमुळे वाचनाची आवड कमी झालेली असली तरी आपल्या वाचकांकरिता चांगले दर्जाचे वाचनसाहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम देऊन ही आवड वाढविण्याचे महत्वाचे कार्य पार पाडण्यास सार्वजनिक वाचनालये आर्थिक व इतर कारणांनी कमी पडलीत. इन्स्टंटच्या युगात चांगली दर्जेदार पुस्तके वाचण्याऐवजी रहस्यकथा व हीन दर्जाचे वाचन वाढीला लागले. पूर्वी चांगली दर्जेदार नाटके व इतर सांस्कृतिक कार्यक्रम सार्वजनिक वाचनालयांच्या सांस्कृतिक भवनात होत असत. आज व्यवसाईक नाटकांना ही सांस्कृतिक भवने भाड्याने देऊन त्यातून वाचक आकृष्ट करण्याऐवजी नाट्यगृहाचे भाडे वसुल करण्याकडे सार्वजनिक वाचनालये वळल्याने चांगला वाचक या कार्यक्रमांना येईनासा झाला आहे.

**२) शासनाची उदासीनाता:-**

ग्रंथालयांना निधिची तरतूद करताना भविष्यातील संभाव्य वाढीचा विचार करण्यात न आल्याने बऱ्याच राज्यांमध्ये निधी अभावी सार्वजनिक ग्रंथालये बंद करावी लागत आहेत. किंवा उपलब्ध अल्प निधीतून कशीतरी चालवावी लागतात. नैसर्गिक वाढीचा कायद्यात विचारच झालेला नाही. आर्थिक तरतुदी करतांना ग्रंथालय कर आकारून जर ही चळवळ उभारली गेली असती तर या चळवळी करिता वेळोवेळी ग्रंथालय करामध्ये वाढ करून ठराविक राशी या क्षेत्राकरिता उपलब्ध झाली असती. घटनेप्रमाणे राज्य या बाबत स्वायत्त असल्याने अलग अलग राज्यांच्या ग्रंथालय कायद्यात वेगळ्या तरतुदी आहेत. अनेक प्रयत्नांनी केन्द्रीय ग्रंथालय कायदा अस्तित्वात येऊ शकलेला नाही. सर्व सार्वजनिक वाचनालये कायद्याप्रमाणे स्वायत्त असल्याने एकच क्षेत्रातील दोन वाचनालयांचा संपर्क किंवा सहकार्य होऊ शकत नाही. प्रादेशिक विषयमतेमुळे सुद्धा अनेक प्रश्न निर्माण झालेत. भाषिक विशेषतेमुळे सर्व भाषांचे वाचन साहित्य एकच ग्रंथालयात मिळत नाही हे सुद्धा एक कारण सार्वजनिक ग्रंथालय हे सार्वजनिक न होण्यामागील एक कारण आहे.

### ३) सार्वजनिक ग्रंथालयांची उपेक्षा :-

समाजातील सर्व स्तराच्या वाचकांकरिता वाचन साहित्य उपलब्ध करून देण्याचे सार्वजनिक वाचनालय हे एकमेव केन्द्र आहे. म्हणजेच वाचनसंस्कृतीचा आणि वांङ्मयाचा प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य सार्वजनिक वाचनालये करतात. निरक्षरांना साक्षर केल्यानंतर त्यांची लिहण्या वाचनाची सवय सतत ठेवण्याची कार्य ही वाचनालये योग्य रीतीने करू शकतात. स्वयं शिक्षणाचे केन्द्र म्हणून या संस्था योग्य आहेत. सांस्कृतिक, ऐतिहासिक साठा जतन करु शकतात. परंतु आपल्या देशात या संस्थांना द्यावयास पाहिजे तेवढे महत्व या बाबत दिले गेलेले नाही. ह्या संस्था या बाबत सतत उपेक्षित राहिल्या आहेत.

समाजप्रबोधन, संस्कृतिक, लोकजागृती, वाचन प्रसार इत्यादी बाबी वाढल्या पाहिजे असे राजकारणी, विचारवंत सतत सांगत असले तरी ह्या सव; गोष्टींमध्ये प्रत्यक्ष, सतत मग्न असलेली ही सार्वजनिक वाचनालये या लोकांकडून नेहमी उपेक्षित राहिली आहेत. सार्वजनिक वाचनालयांचे वाढी करिता या धुरंधराकडून कधीही योग्य ते सहकार्य मिळाले नाही. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात असुन सुद्धा अनेक खेडी या संस्थापासून वंचित आहेत. '' गाव तेथे ग्रंथालय'' ही संकल्पना आज पावेतो स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होऊन गेली तरी साकार होऊ शकली नाही. ही उपेक्षा दूर होऊन सार्वजनिक वाचनालये माहितीचा अधिकार वापराची महत्त्वाची केन्द्र बनली पाहिजेत. वाचनाची आवड एकदम लागत नाही तिची गोडी लावणे, मनाला वळण लावणे आवश्यकत असते, त्या करिता वाचन साहित्य सहज उपलब्ध असणे आवश्यक आहे. एकदा लागलेली गोडी सतत टिकली पाहिजे. नवाक्षरांना फक्त साक्षर करूनच योजना १००% यशस्वी झाली असे नाही तर नावसाक्षरांना त्या पुढील वाचन साहित्य सतत उपलब्ध करून त्याची वाचन लेखनाची सवय सतत टिकवून ठेवणे, वाढ करणे आवश्यक आहे. नाही तर काही काळाने पुन्हा हे नवासाक्षर अशिक्षित होऊन या योजनेवरील खर्च वाया जाईल. तसेच इतर शासकीय कार्यक्रमांचे होणार आहे. या करिता प्रत्येक गावात सार्वजनिक माहिती केन्द्र म्हणून स्थापन करून सर्व शासकीय योजना या सामाजिक केन्द्रा मार्फत त्यांचा प्रचार प्रसार केला तर त्या अधिक परिणामकारक व यशस्वी होऊ शकतील. त्या करिता या ग्रंथालयांची उपेक्षा सोडून शासन कर्त्यांनी याच्या करिता सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे.

### ४) वाचन साहित्याचे व्यापारी करण :-

माहिती मिळविणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. कोणत्यावेळला कोणत्या माहितीची गरज कोणाला पडेल सांगता येत नाही. दररोज नवीन नवीन माहिती उपलब्ध होत असल्याने सर्व माहितीचा संग्रह करणे कोणत्याही एक ग्रंथालयाला शक्य नाही. कागद व इतर छपाई वस्तुंच्या किमतीतील वाढीचे कारण पुढे करून प्रकाशित साहित्यांच्या किमतीत प्रकाशकांनी भरमसाठ वाढ केलेली त्यामुळे अगोदरच आर्थिक अडचणीत असलेली सार्वजनिक ग्रंथालये आर्थिक टंचाई अभावी वाचकांची नवीन वाचन साहित्याची वाढती मागणी पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे वाचन साहित्य सहज उपलब्ध न झाल्याने कंटाळून वाचक या ग्रंथालयांकडे पाठ करीत आहेत. सार्वजनिक वाचनालये ही ग्रंथ विक्रेत्यांची फार मोठी ग्राहके असल्याने ती बंद झाली तर ग्रंथांच्या मागणीत भरमसाठ घट होणार असल्याने प्रकाशित साहित्यांच्या किमती कमी करून दर्जेदार वांङ्मय कमी किमतीत सार्वजनिक वाचनालयांना उपलब्ध करून देण्याचे धोरण प्रकाशकांनी अंवलंबणे आवश्यक आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात या सोयी तुर्त नवीन असल्याने व ग्रामीण भागात त्या पुरेशा प्रमाणात तुर्त उपलब्ध नसल्याने, तसेच त्यांच्या वापराच्या माहिती अभावी सार्वजनिक वाचनालये त्यांचा वापर तुर्त

करू शकत नाहीत. त्यामुळे मुद्रा या साधनांद्वारे सहज व स्वस्त उपलब्ध होऊ शकणारी नवीन माहिती ही ग्रंथालये वाचकांना उपलब्ध करून देऊ शकत नाहीत. या वाचनालयांचा वाचक वर्ग कमी झालेला आहे.

सार्वजनिक वाचनालयांच्या कार्यकर्त्यांची उदासीनता, प्रशिक्षित कार्यकर्ते, कर्मचारी यांचा अभाव, ही इतर कारणे सार्वजनिक वाचनालये ही सर्व जनांकरिता भारतात खऱ्या अर्थाने होऊ शकली नाहीत असे म्हणावे लागते. परंतु गरज ही शोधाची जननी आहे व पुढील २१ व्या शतकात माहितीचा हक्क प्राप्त झाल्याने ती मिळविण्याचे सहज उपलब्ध साधन म्हणून या सार्वजनिक वाचनालयांना महत्त्व प्राप्त होणार आहे. अधिक आधुनिक स्वरूपात ही चळवळ वाढीला लागेल. तिचे आजचे स्वरूप कदाचित बदलेल. कदाचित फक्त एक पी.सी. व इंटरनेट कनेक्शन असे पेपरलेस स्वरूप या संस्थांना येईल परंतु ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था आहे या डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ग्रंथालय शास्त्रातील एका सूत्राप्रमाणे सार्वजनिक वाचनालयाची चळवळ सतत वाढत राहील यात शंका नाही.

संदर्भ :-

१) ग्रंथालय कायदे य.च.म.मुक्त विद्यापीठ

२) ज्ञान गंगोत्री - जून २००० य.च.म.मुक्त विद्यापीठ

**श्री. ह. देशपांडे**
ग्रंथपाल, गो. सी. टोपे महाविद्यालय, चांदूर-बाजार

• • •

## सहवेदना



श्री. भूपेंद्र रामचन्द्र शिंदे, कार्यालय अधिक्षक, विधी महाविद्यालय, ठाणे यांचे ९-५-२००२ रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. २५ वर्षांहून अधिक काळ विधी महाविद्यालयाच्या सेवेत असलेले श्री. शिंदे, प्रशासकीय व कार्यालयीन कामात निष्णात होते. अत्यंत निःस्पृह, प्रामाणिक व कार्यतत्पर स्वभावामुळे ते विधी महाविद्यालयाचा आधारस्तंभ होते. त्यांच्या मनमिळाऊ व इतरांना बरोबर घेऊन काम करण्याच्या वृत्तीमुळे ते सर्व सहकाऱ्यांमध्ये तसेच विद्यार्थीवर्गात प्रिय होते.

त्यांच्या अकस्मिक निधनामुळे कार्यालयाची कधीही भरून न येणारी हानी झालेली आहे. आम्ही सर्व विधी महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी वर्ग त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना !

# विद्यार्थी वर्तुळ - अभियांत्रिकी (भाग - १)

*निरनिराळ्या शाखांतील विद्यार्थी, त्यांच्या अभ्यास शैली वेगळ्या असतात. अशा शाखांमधील विद्यार्थी जीवनाचा वेध घेऊ पाहणारा लेख. - संपादक*

**प्रस्तावना -**

" विद्यार्थी वर्तुळ " या लेखमालेतून विविध क्षेत्रातल्या विद्यार्थ्यांचे जीवन, त्यांचे सुख-दुःखं, त्यांचे प्रश्न आपल्या समोर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. या भागात आपण अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी जीवन पाहू या.

अभियांत्रिकीचा अभ्यास नेमका कसा असतो ? काय असतो ? ते जीवन कसे असते ? अशा अनेक प्रश्नांचं निरसन त्या दिवशी समीर भेटल्यावर झाले. आधी मी समीरची ओळख करून देतो.

समीर आणि मी ११ वी आणि १२ वीला एकत्र होतो. तो पहिल्यापासून शांत, अभ्यासू आणि हुशार मुलगा आहे त्याच्या अभ्यास करण्याच्या पद्धती आणि अथक परिश्रम यांनी मी नेहमीच प्रभावित होत आहे. समीरला सायन्स आणि गणित यामध्ये पहिल्यापासूनच आवड होती. सायन्स शाखेत आल्यावर अभियांत्रिकीकडे त्याची ओढ निर्माण झाली. त्यानुसार त्याला चांगल्या अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला.

त्याच्या अभियांत्रिकी शाखेबद्दल आम्ही खूप गप्पा मारल्या. त्याच गप्पा मी आपल्या समोर सादर करीत आहे. त्यांची सुख-दुःखं. त्यांचे रोजचे जीवन आपल्या समोर आणीत आहे.

महाराष्ट्रामध्ये अभियांत्रिकीला प्रवेश मिळण्यास P.C.M. म्हणजे Physics (भौतिकशास्त्र) Chemistry (रसायनशास्त्र) आणि Maths (गणित) या तीन विषयांमध्ये चांगले गुण मिळणे महत्त्वाचे आहे. १२ वीला गणित व भौतिकचा खूप सराव करावा लागतो. रसायनशास्त्र तर पाठांतरावर आधारित आहे. समीर I.I.T. म्हणजे इंडियन इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजिच्या प्रवेश परीक्षेचीही तयारी करीत होता. पण तिथे काही जमले नाही. I.I.T. चा आणि महाराष्ट्र बोर्डाचा अभ्यासक्रम यामध्ये फार फरक आहे. I.I.T. चे चांगले क्लास ही इथे उपलब्ध नाहीत. जे आहेत ते फार महाग आहेत. त्यामुळे चेन्नई किंवा कोलकत्ताचा कोर्स परवडतो. १२ वीला असतानाही कॉलेजचा फारसा उपयोग होत नाही. वेळ कमी असतो आणि प्राध्यापकांना खूप अभ्यासक्रम शिकवायचा असतो. त्यामुळे अभ्यासक्रम अर्धवट राहतो. याच कारणास्तव क्लासेसचे महत्त्व वाढते. महाग असो वा स्वस्त क्लास लावणे गरजेचेच. अर्थात चांगले गुण मिळविण्यासाठीच. निकाल लागला की, P.C.M. चे गुण बघायचे आणि अभियांत्रिकीला प्रवेश मिळतो की नाही हे नक्की करायचे. हे झाल्यावर हवी ती शाखा मिळते का ? अ दर्जाचे कॉलेज मिळते का ? यासाठी धडपड. चांगले गुण मिळाले म्हणजे प्रवेश झाला, असे नाही प्रवेश प्रक्रियेत तारेवरची कसरत करावी लागते. प्रवेश प्रक्रियेत फॉर्म देणे. घेणे, गुणवत्ता यादी लावणे, प्रवेश देणे या सर्व गोष्टींना नियमाने ५१ दिवस लागले पाहिजेत. पण हा वेळ वाढतोच, हे नक्की. कोर्टाची ऑर्डर आणि कार्टाचा स्टे या गोष्टी या विलंबाला हातभार लावतात. या विलंबामुळे पहिल्या सहा महिन्यांचे सत्र तीन चार महिन्यातच संपवावे लागते. या शिवाय विद्यार्थ्यांचा वेळ जातो. पुढे काय होणार? त्याची धाकधुक आणि पालकांना चिंता हे वेगळेच. त्यात समीर ओपन कॅटेगरीचा मुलगा आधीच ५०% आरक्षण आहेच शिवाय ३०% महिला आरक्षण आहे. त्यामुळे ओपनच्या मुलांना जेमतेम २०% जागाच उपलब्ध आहेत. समीर आरक्षणाच्या विरोधात नाही. त्याच्या मतानुसार भारतासारख्या लोकशाही देशात प्रत्येकाला वर येण्याचा हक्क आहे. मग तो कुठल्याही जातीचा असो किंवा

स्त्री-पुरुष असो. या प्रगतीसाठी आरक्षण ही तितकेच आवश्यक आहे. पण त्याला ही काही मर्यादा हवी. समीरला चांगले मार्क असल्यामुळे त्याला अ दर्जाच्या कॉलेजात मेकॅनिकल शाखेत प्रवेश मिळाला.

नव्या उमेदीने कॉलेज सुरु झाले. आता रॅगिंगची भीती. पण समीरचे रॅगिंग झाली नाही. असे असले तरी काही कॉलेजमध्ये हा त्रास असतो. तो ही त्रास एक महिन्याने शांत होतो. अभियांत्रिकीचा पूर्ण अभ्यासक्रम चार वर्षाचा, त्याला आठ सत्रांमध्ये विभागले आहे. पहिल्या वर्षी खूप त्रास होतो. सारे विषय नवे असतात काही कळत नाही. कसा अभ्यास करावा. किती अभ्यास करावा. १२ वीचा पूर्व अभ्यासक्रम इथे पहिल्या सत्रात म्हणजे तीन चार महिन्यात पूर्ण करावा लागतो. त्यामुळे खूप मानसिक तणाव व दडपण येते. त्यावर निरनिराळ्या असाइनमेंटसचा बोजा. असाइनमेंटस् म्हणजे एका विषयाच्या अशा सात आठ प्रश्न सोडविण्याचे असतात. प्रत्येक विषयाचा असे ७-८ असाइनमेंट असतात. अनेक विषयांच्या असाइनमेंटस् देण्याच्या तारखा (सबमिशन डेट) जवळ आल्या की, नुसता वीट येतो. पण २ ऱ्या वर्षापासून याची सवय होते. खरं तर या असाइनमेंटमुळे अभियांत्रिकी शाखेतील जीवन फार व्यस्त होते.

अभियांत्रिकी फार " बिझी " असलं खूप भरपूर अभ्यास असला तरी मौज मजा करणे. सिनेमा पाहणे. बंक मारणे. कॅम्पस फिरणे, कॅंटीन या गोष्टी जोमाने चालू असतात. खरं तर हे सारं असणं म्हणजे अभियांत्रिकीचा विद्यार्थी असणं आणि हे सार संपणं म्हणजे पूर्ण अभियंता होणं. त्याच बरोबर निरनिराळे सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेह संमेलन यांची रेलचेल असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कला आणि क्रीडांमधील सुप्त गुण सादर करण्यास व्यासपीठ मिळते. इथल्या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मुले जे शिकतात त्याचा उपयोग करून निरनिराळी यंत्रे बनवून त्यांचे प्रदर्शन भरविण्यास संधी मिळते. यातून विद्यार्थ्यांचे " टेक्नीकल स्कील " समोर येते.

अभियांत्रिकी शिकत असताना विद्यार्थ्याला सरकारकडून शिष्यवृत्ती प्राप्त होत नाही. कॉलेज किंवा संस्थेकडून ही नाही. रतन टाटा ही एकच शिष्यवृत्ती प्रतिवर्ष १४०००/- रु. फी आकारली जाते. त्यात रु. १०,०००/- ट्यूशन फी आहे. वरचे रु. ४०००/- डेव्हलपमेंट फी. डेव्हलपमेंट फी प्रत्येक कॉलेजात बरं का ! सरकारनेच यास परवानगी दिली आहे. परंतु या डेव्हलपमेंट फी चां काही एक गरज नाही. कारण पेमेंट सीटस् आणि एन. आर. आय. सीटस् मधून संस्थेला चांगला फायदा होतो. शिवाय आरक्षणाच्या रिकाम्या जागाचं काय होत असेल याचा तुम्ही अंदाज लावू शकता ? अर्थात मेनेजमेंट सिटस् म्हणून यांना ही विकलं जातं मेनेजमेंट सिटस् वेगळ्या असतात हा निराळा भाग.

समीरच्या मतानुसार तो खूप शिकणार, खूप कष्ट करुन बी. इ. ची पदवी प्राप्त करणार. परंतु पुढे काय होणार? खाजगी कंपनीत कामाला लागणार परंतु अलीकडे त्यांचा काय भरवसा ? त्यांचे ही कधीही लॉकआऊट होतं. दुसरा पर्याय म्हणजे सरकारी नोकरी. सरकारात अभियंता म्हणून काम करण्याचा मार्ग म्हणजे आय. इ. एस. अथवा इंडियन इंजिनिअरींग सर्व्हिसेस. परंतु इथे ही स्पर्धा प्रचंड प्रमाणात वाढली आहे. कारण अभियांत्रिकीचे उमेदवार भरपूर प्रमाणात आहेत आणि जागा खूप कमी आहेत. परंतु संधी मिळाल्यास डिफेन्स् आणि एरोनॉटिकस् मध्ये आपलं " स्कील" दाखवण्यास मिळत. विदेशी कंपन्यामध्ये काम करायचे तर राबराब राबावे लागते आणि वेळ आल्यास काम सोडावे लागते. पुढे काय होणार ? हा मोठा यक्ष प्रश्न आहे. परंतु " जिथे आवड तिथे सवड " या होकारार्थी विचाराने, मेहनतीने, कौशल्याने, पदोपदी आपली क्षमता सिद्ध करून पुढे जायचे. अखेर कष्टांना माणसाला फळ मिळणारच.

**केतन लक्ष्मण कांबळे**
३०२, स्वप्नवन, प्लॉट क्र.१७, लोकमान्य नगर,
ठाणे (प) फोन नं. : ५८० ०२३४

•••

# अग्निपंख

*अग्निपंख हे आत्मचरित्र वाचलेच पाहिजे असे पुस्तक आहे. त्याचा हा परिचय. - संपादक*

डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम, तामिळनाडू मधील रामेश्वर या गावी १९३१ मध्ये एका अशिक्षित नावाड्याच्या पोटी जन्मला आले व आज वयाच्या ७०व्या वर्षी सरकारी सेवेतून मुक्त होऊन त्यांनी देशातील कुमारावस्थेतील मुले व युवकांना कार्यप्रवण, विज्ञानाभिमुख व संशोधक वृत्तीचे बनविण्याचा संकल्प सोडला आहे.

अग्नी, आकाश, पृथ्वी, त्रिशूल, नाग या क्षेपणास्त्रांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असलेले, आण्विक क्षेत्रातही देशाला स्वयंपूर्ण करून जगामधील पहिल्या सहा देशांच्या पंक्तीत नेऊन उभे करणारे हे टोलेजंग व्यक्तिमत्त्व 'अग्निपंख' या त्यांच्या आत्मचरित्रातून उलगडत जाते.

लहापणीच्या त्यांना घडविणाऱ्या गोष्टी, विद्यार्थी असताना विकसित झालेल्या जाणीवा, वेगवेगळ्या गुणांची त्यांच्या शिक्षकांनी त्यांची करून दिलेली ओळख, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या समृद्धतेमध्ये जाणीवपूर्वक मिळालेला शिक्षकांचा / सहकाऱ्यांचा सहभाग.

अेअरोडायनमिक्स या विज्ञानशाखेचे शिक्षण घेताना वैचारिक वाचन, लेखन व शिक्षकांचे मार्गदर्शन यातून बुद्धीचा, व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला. विज्ञानाचे कोडे उलगडले.

'माझ्या दृष्टीने विज्ञानात बुद्धी इतकीच हृदयाला मारून टाकायची शक्ती आहे. विज्ञानाचा सखोल अभ्यास शेवटी बुद्धीचा विकास करतो, अध्यात्मिक उंची वाढवितो आणि स्वतःची नव्याने ओळख पटवून देतो. अशी स्वतःची ओळख पटल्यावर मग वैश्विक गूढ, ग्रह, ज्योतिषशास्त्र, विज्ञानाधिष्ठित समज-गैरसमज थोडक्या शब्दात सुस्पष्ट करण्याची हातोटी ह्या आत्मचरित्रामध्ये आहे.

'ज्याला आपण घनरूप समजतो, त्यामध्ये खूप रिकामे आकाश असते. अन् ज्याला आपण स्थिर म्हणतो त्यामध्ये प्रचंड प्रमाणात गती असलेले कण सतत फिरत असतात. हा प्रत्यक्ष आणि डोळ्याला दिसते त्याचा विरोधाभास समजून घेतला; अन मला वाटले, आपल्या अस्तित्वाच्या प्रत्येक क्षणी जणू साक्षात शिवशंकराचे या पृथ्वीवर तांडवनृत्य सुरु असते.' हे सहजपणे लिहिणारे अब्दुल कलाम हे 'पद्मभूषण' व 'भारतरत्न' या उपाधींनी सन्मानित झालेले आहेत.

विकसनशील राष्ट्र म्हणून सातत्याने विकसित राष्ट्रांपुढे झोळी पसरून उभे रहावे अशी जागतिक परिस्थिती असताना, विज्ञान-तंत्रज्ञान व शस्त्रास्त्रांमध्येही भारताचे स्वयंपूर्णतेचे स्वप्न साकार करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचे अद्‌भूत पंख उलगडून दाखविणारे 'अग्निपंख' 'Wings of fire' हे पुस्तक प्रत्येक अभियंत्याने नक्की वाचायला हवे.

'कल्पना आणि निर्मिती
भावना आणि प्रतिसाद
यामध्ये एक अनिश्चिततेची
सावली पसरलेली असते.

या 'इलीयट' या आंग्ल कवीच्या भावनांचा, काव्यपंक्तीचा, लेखकाने संभाषणातून संवादातून केलेला वापर हे आत्मचरित्र आपल्या हृदयापर्यंत नेऊन पोहोचवते.

एका 'कल्पक' माणसाच्या 'कल्पनाराज्य' निर्मिती मागच्या भावनेला आपल्या मनातील आंदोलनाचा प्रतिसाद मिळू लागतो. छोट्या छोट्या संकटांना घाबरून पलायनवाद स्वीकारणाऱ्या या सुखाची 'नोकरी' पदरात पाडून आपले आयुष्य सार्थकी लावण्याची कल्पना बाळगणाऱ्यांना हे चरित्रवाचन एक आव्हान आहे.

ज्यांना आपल्या क्षेत्रामध्ये उच्च पदावर पोहोचायचे आहे, त्यांच्यासाठी संपूर्ण बांधिलकी हा गुण आवश्यक आहे. आपली पूर्ण कार्यशक्ती, आपल्याला हव्या असलेल्या, आवडत असलेल्या कामात ओतली, तर दुसऱ्या कुठल्या इच्छेला मनामध्ये जागाच उरत नाही.

'ज्यावर आपला पूर्ण विश्वास नाही ते कधीही आपल्या हातून नीटपणे पूर्ण होणार नाही. कामामुळे उत्पन्न होणारे ताणतणाव सहन करण्याची आपली तयारी हवी.'

'आपल्या मनाची, शरीराची पूर्ण तयारी झाली नसेल तर यश मिळवणे, पचविणे माणसाला जड जाते. प्रत्येकात एक देवदत्त सुप्त बुद्धीची चालना मिळाली, ती जागृत झाली, तर हातून खूप मोठी कामे होतात.'

हे सर्व कथन एक यशस्वी, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे आहे. वैज्ञानिक असल्याने सूत्र रूपात हे शब्दबद्ध करतानाही प्रत्येक सूत्र तपासून घेतले आहे. व्यवहाराच्या मुशीत अगदी आजच्या जगातही ते सूत्र यशस्वी ठरले आहे. यशस्वी माणूस घडला आहे.

या सगळ्यामागे एक गूढ पवित्र आंतरिक शक्ती आहे. वाचताना वारंवार जाणवते, एका झपाटलेल्या शक्तीचे अस्तित्व . आणि हेच अस्तित्व, जे प्रत्येक संकटाच्या अगदी पराकोटीच्या अपयशाच्या वेळीही कुठल्या ना कुठल्या रूपामध्ये अस्तित्व दर्शविते.

'कुणी माणूस कितीही छोटा असेल, गरीब असेल, अभावाच्या परिस्थितीत असेल तरी त्याने हिम्मत हरण्याची गरज नाही. समस्या ही जीवनाचा भाग आहे, दुःख हे यशाचे सार आहे.' कुणी म्हटलेच आहे.

देवाने वचन दिलेले नाही,
आकाश सदैव निळेच राहील.
आयुष्याच्या पाऊलवाटा
फुलांनी सजविलेल्या राहतील.
देवाने वचन दिलेले नाही,
पावसाशिवाय सूर्य
दुःखाशिवाय सुख
वेदनेशिवाय शांती.

कुणी गरीब मुलगा, कोपऱ्यातल्या गावी रहात असेल, अभाव असलेल्या समाजस्तरावर जीवन व्यतीत करत असेल; तर माझ्या आयुष्याला नियतीने दिलेला आकार पाहून दिलासा मिळेल. निराशेच्या, मागासपणाच्या, खोट्या आभासमय कल्पनांच्या बंधनातून मुक्त व्हायला मदत होईल.

पण देवाने वचन दिले आहे.
दिवसापुरती शक्ती
श्रमानंतर विश्रांती
पावलापुरता प्रकाश.

या चरित्राचे वेगळेपण आहे, त्याचे काही देणे आहे, मागणे आहे. नुसत वाचून सुंदर आहे म्हणून बाजूला ठेवून द्यायचे नाही तर घरातील एका फळीवर पुस्तक आणून ठेऊन ते वारंवार अनुभवायचे आहे.

हा एक जगावेगळ्या शब्दप्रवासाचा अनुभव आहे. महानुभवाप्रमाणे आपले आयुष्य उधळून दिलेल्या या महान व्यक्तिमत्त्वाची इच्छा आहे.


प्रत्येक भारतीयाच्या अंतकरणात वसत असलेल्या अग्निबिंदूला पंख लाभावेत आणि या महान देशाचे भवितव्य उजळून निघावे, त्याने आकाशाला पालाण घालावे !

इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणाचाच विचार करता त्या विषयांचे 'पाठ्यपुस्तक' व्हावे इतकी पुस्तकाची क्षमता आहे.

आजच्या प्रलोभनांच्या जगात अवखळपणे वहाणाऱ्या या जीवनप्रवाहात भरकटलेल्या अनेक आयुष्यांना दिशादर्शन करण्याचे सामर्थ्य या पुस्तकात आहे. लाखो हजारो वाचकांना 'अग्निपंख'' लावून ह्या भारतमातेच्या सेवेत समर्पित करण्याचा ह्या वैज्ञानिकाच्या प्रयत्नात माझा मुंगीचा वाटा......... हे पुस्तक तुम्ही वाचावे हीच सदिच्छा !!

**प्रा. विद्याधर वालावलकर**
रवि-उदय सोसायटी,
चेंदणी, ठाणे ४०० ६०१.

• • •



ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाला अलीकडे बरीच मागणी येत आहे असा अनुभव आहे.

आमच्या कला वाणिज्य महाविद्यालयात पदवी परीक्षेनंतर करता येणारा मुंबई विद्यापीठाचा B.L.I.Sc. हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. इच्छुकांनी प्रा. नारायण बारसे (ग्रंथपाल) यांना भेटावे.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठचा B.L.I.Sc. हा अभ्यासक्रम (एक वर्ष मुदत पदवी) उपलब्ध आहे. प्रवेश पात्रता किमान पदवीधर ही आहे. इच्छुकांनी महाविद्यालयाचे ग्रंथपाल व केंद्रसंयोजक प्रा. मोहन पाठक यांना भेटावे.

• • •

# इंधन वाचविण्याचे साधे सोपे उपाय

*श्री. कोपरकरांच्या लेखमालेवर बऱ्याच जणांनी उपयुक्त असल्याचा अभिप्राय दिला. या सर्व लेखमालेचे सार एका लेखात आले. या उद्देशाने हा लेख देत आहोत. - संपादक*

**क्लचवर पाय ठेवून गाडी चालवू नका :**

१) क्लचमध्ये फ्री प्ले असतो. प्रत्येक मॉडेलमध्ये बदल असतो. टाटा गाडीचा १। इंच किंवा ३० एम्.एम्. व लेलँड गाडी ३।।। इंच प्ले असतो. आपण गाडी चालवितांना क्लचवर पाय ठेवून चालवितो. पायाच्या वजनामुळे प्ले जातो. रस्त्यात खळगे, स्पीड ब्रेकर असतात, गाडीला झटके बसतात तसे आपल्या पायालाही बसतात व आपला पाय मागे पुढे हलत असतो. त्याचा परिणाम क्लचचे नुकसान व ट्रॅन्समिशन पॉवर मध्ये अडथळा. यामुळे तेलाचा खर्च वाढतो असे दोन प्रकारचे नुकसान होते. म्हणून क्लचवर पाय ठेवून चालवू नका.

२) **अति वेगात गाडी चालवू नका :**

१) तेल वाचविण्यासाठी ४० ते ५५ किलो मीटर वेग चांगला.

२) ॲक्सिडेंटच्या जास्तीत जास्त खात्री

३) वित्तहानी, प्राणहानी होते

४) जादा ब्रेकच्या वापरामुळे ब्रेक व लाईनरची घिसावट म्हणून वेग मर्यादित गाडी चालवा.

३) **तेलाची गळती थांबवा :**

प्रत्येक सेकंदाला गळणारा एक थेंब सर्व वर्षात ५६८ लिटर तेल बरबाद करतो. तेव्हा दुर्लक्ष करू नका. टँक ते फ्युअल इंजेक्शन पर्यंत तेलाची गळती होऊ शकते. गळती आपल्या अधिकाऱ्याच्या नजरेस आणा.

४) **गतीप्रमाणे गाडीचे गिअर बदली करा :**

इंजिन हे चालकांशी बोलत असते ते सांगत असते गिअर बदली करा. इंजिनची भाषा समजली पाहिजे. प्रत्येक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी गिअरची रेषा (प्रमाण) ठरवून देते. त्या प्रमाणात जशी गाडीची गती वाढते त्याप्रमाणे गिअर बदली झाले पाहिजेत.

जास्त अंतर जास्त वेळ <u>लो</u> गिअर मध्ये गाडी चालवाल तर डिझेल खर्च वाढत जाणार.

टाटाचे टेम्पो : स्पेशल गिअर ० ते ८ - पहिला गिअर १ ते १५. दुसरा गिअर १६ ते २७, तिसरा गिअर २७ ते ४० आणि पुढे टॉप गिअरर.

५) **टायर प्रेशर योग्य ठेवा.**

कोठलीही मॅन्युफॅक्चरिंग टायर ट्यूब तयार करते त्यावेळी साईझ प्रमाणे हवेचा दाब निश्चित केलेला असतो. त्याप्रमाणे दाब आहे किंवा नाही हे तपासणे आवश्यक आहे. दाब कमी असेल तर त्याचा परिणाम टायरची आयुमर्यादा कमी होते व तेलाचा खर्च वाढतो.

दाब जास्त असल्यास गाडी धडधडत चालते त्याचा परिणाम आजुबाजूच्या पुर्ज्यांना मार बसतो व नुकसान होते व गाडी स्लीप होते. तेव्हा दाब जास्त किंवा कमी असता कामा नये.

**६) झटके देवून गाडी चालवू नका (जर्कि ड्रायव्हिंग)**

झटक्यामुळे संपूर्ण ट्रॅन्समिशनचे नुकसान होते. झटके दोन प्रकारांनी येतात - १) क्लच झटक्यांनी

सोडल्यामुळे ३) एकदम अॅक्सिलेटर दाबणे व सोडण्यामुळे. तेव्हा दोन्ही क्रिया सवकाशीने करा.

ट्रॅन्समिशन पार्ट रिपेअर करता येत नाही ते फेकून देणे व नवीन बसविणे. त्यांत १) क्लच प्लेट, २) गियर बॉक्स, ३) जॉईंट प्रोपेलर शाफ्ट ४) डिफ्रेन्शिअल आणि गिअर अॅक्सल वगैरे

**७) एका जागेवर १ ते १॥ मिनिटापेक्षा जास्त थांबायचे असेल तर इंजिन बंद केले पाहिजे.**

एका जागेवर १ तास गाडी उभी केली (आयडिंग स्पीड) २ लीटर्स खर्च होते म्हणून ज्या ठिकाणी ट्रॅफिक जास्त असेल तर इंजिन बंद केले पाहिजे. कोठल्याही इलेक्ट्रॉक सिग्नलला बंद करण्याची जरुरी नाही कारण असे सिग्नल मिनिटांत नसतात तर सेकंदात असतात अशा वेळी गाडी बंद केल्यामुळे वाचणारे तेल पुन्हा गाडी स्टार्ट करतांना जास्त खर्च होते. उदाहरण : बी.ई.एस.टी. मधील चालक डेपोच्या आंत तेल वाचवू शकतो ते कसे ते पाहू-

गाडी चालू करण्यापूर्वी सर्व भाग चेक करणे आवश्यक असते. परंतु चालक आधी इंजिन चालू करतो व नंतर तपासणी करतो तेल खर्च होत असते. कंडक्टर कॅश बॉक्स आणावयास गेलेला असतो म्हणून सर्व तपासणी करावी. कंडक्टर आल्यानंतर गाडी चालू करावी.

**त्याचे प्रमाण -**

१ तास( ६० मिनिटे) - २ लीटर्स खर्च होते.

| | | |
|---|---|---|
| दशांश भाग ६ मिनिटे | .२ | २०० मिली खर्च |
| अर्धा भाग | .१ | १०० मिली खर्च |

बी.ई.एस.टी.च्या २०० गाड्या आहेत.

प्रत्येक गाडी ३ मिनिटे थांबली २०० लि. एका दिवसाला.
जरा जास्त विचार केला तर x ३० महिन्याचे दिवस

६००० लीटर्स

वर्षाचे महिने १२ x १२

७२००० लीटर्स गुणिले तेलाचा भाव

म्हणजे कल्पना येईल की आपण किती वाचवितो हे लक्षांत येईल.

श्री. वि. ना. कोपरकर
कळवा, ठाणे.

• • •

# दिशा

**वर्गणी १२०/-**
**लेख व वर्गणी पाठविण्याचा**

**पत्ता.-**
**विद्या प्रसारक मंडळ**
**डॉ. बेडेकर विद्या मंदिर,**
**नौपाडा, ठाणे ४०० ६०२.**
**दूरध्वनी : ५४२ ६२७०**

# प्युपिलोमीटर

*'अ' जीवनसत्वाचा अभाव जाणून घेण्याच्या दृष्टीने प्युपिलोमीटर हे उपकरण वापरले जाते. या उपकरणाची ही माहिती. - संपादक*

मनुष्य देहाच्या जडणघडणीत सहा जीवनसत्वे अतिशय मोलाचे कार्य करतात. प्रत्येकाचे महत्व सारखेच. हा उजवा तो डावा असे म्हणताच येणार नाही. पण जेव्हा आपण त्यांना एकत्र कुटुंबात भावंडाची उपमा देतो तेंव्हा थोरला, मधला, धाकटा असे थोडे वर्गीकरण करणे भाग पडते अन म्हणूनच मला जीवनसत्व 'अ' मोठ्या भावाच्या रुपात अतिशय योग्य वाटते. थोरला भाऊ हा घरचा आधारस्तंभ असतो. 'अ' च्या बाबतीत नेमके तेच आहे. जीवन सत्वांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे. हवेमध्ये कितीतरी प्रकारचे रोग निर्माण करणारे जंतू व जिवाणू असतात. आपल्या श्वसन माध्यमातून ते सतत आपल्या शरीरात जात असतात. मग आपणास हे रोग का होत नाहीत ? त्याला कारण आहे आपल्या शरीरात असलेला 'अ' जीवनसत्वाचा योग्य साठा. या साठ्यात कमतरता झाली की आपण वेगवेगळ्या रोगांना बळी पडू शकतो. कारण रोगांशी लढणारी आपली प्रतिकारशक्ती कमी झालेली असते व अशाच वेळी डॉक्टर आपणास प्रतिजैविके किंवा तत्सम औषधे देतात. जीवनसत्व 'अ' च्या अभावामुळे मानवाची अंधारात पहाण्याची शक्ती नष्ट होते. यालाच आपण रातअंधळेपणा म्हणतो. त्याच प्रमाणे प्रजोत्पादनासारख्या आवश्यक क्रियेवर ही परिणाम होतो. 'अ' जीवनसत्वाच्या आभावामुळे नाक, डोळे, अन्न नलिकेच्या आतच्या आवरणावर नव्याने तयार होणाऱ्या पेशी तुटलेल्या व अपुऱ्या वाढीच्या असतात. त्यामुळे सतत नाक वहाणे, डोळ्याचे रोग, अपचन व अन्न नलिकांचे विकार होतात. हे विशेषत: लहानमुलांच्या मध्ये प्रकर्षाने दिसून येते. नवीन संशोधनातून एड्स (Aids) व कॅन्सर सारखे रोग जीवनसत्व 'अ' च्या योग्य वापरातून नियंत्रित करता येतात हे सिद्ध झाले आहे.

ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागात कार्य करताना माझ्या असे लक्षात आले की दरवर्षी पावसाळ्यात ४ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके (वारली लोकांची) मोठ्या प्रमाणावर मृत्यू पावतात. जून ते सप्टेंबर हा या भोत मरिआईचा घाला म्हणून ओळखला जातो. या चारमहिन्यात येथे फक्त पटकी, झाड्या यांचेच राज्य असते. वरील वयोगटातील प्रत्येक बालक कातडीचे रोग, पोटात कृमी, संडास या रोगांनी सतत आजारी असतात. हे रोग संसर्गजन्य असल्याने त्याची लागण इतर बालकांना त्वरित होते. त्यांच्या आहाराचा मी विशेष करून अभ्यास केला. संशोधनाचे निष्कर्ष धक्कादायकच होते. आहारात प्रथिने व जीवनसत्व 'अ' चे प्रमाण फारच कमी होते. आहारात, प्रथिने व मातेचे दूध जीवनसत्व 'अ' चे नुसते भांडार असते. पण रुढी, परंपरा व अंधश्रद्धा यामुळे पहिले ३ दिवस बाळाला ते मिळतच नाही. नंतरच्या ३-४ महिने कालावधीत मिळणारे मातेचे दूध ही त्यांच्यास अपुरे असते. कारण वारली मातेच स्वत: कुपोषित असते. मातेचे दूध तुटल्यावर बाळाच्या हातात नागलीच्या भाकरीचा तुकडा दिला जातो. कुपोषण व रोगाला या स्टेजपासून सुरुवात होते. अपुरे अन्न व जीवनसत्वचा अभाव यामुळे बालके संसर्गजन्य रोगास त्वरित बळी पडतात.

बाळास वारंवार होणारे संसर्गजन्य रोग, पोटातील कृमी, कातडीचे रोग सतत वाहणारे नाक, उदास मलूल होऊन पडणे, म्लान चेहरा यावरून जीवनसत्व 'अ' ची

कमतरता लगेच लक्षात येते. डोळ्याच्या परीक्षेवरूनही हा अभ्यास तपासता येतो. परंतु रक्ताची तपासणी करून त्यातील रेटिनॉलचे प्रमाण किती यावरून आपणास त्या बालकात अथवा व्यक्तीत जीवनसत्व 'अ' चा अभाव ओळखता येतो व त्यावरून योग्य ते जीवनसत्व 'अ' चे थेंब देता येतात. या पद्धतीने 'अ' ची तपासणी करणे माझ्या दृष्टीने अव्यवहारी, वेळखाऊ पद्धत होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आदिवासी बालकांचे रक्ताचे नमुने गोळा करणे- तेथून २५० कि. मी. अंतरावरून मुंबईत आणणे व नंतर त्याचे पृथःकरण करण्यासाठी दिल्ली किंवा हैद्राबादला पाठविणे - कारण ही व्यवस्था हव्या त्या किंमतीत मुंबईत उपलब्ध नाही. आणि आपणास रक्तात रेटिनॉलचे प्रमाण किती आहे समजल्याशिवाय 'अ' चे थेंब योग्य प्रमाणात देता येत नाहीत. आणि बालकांचे अकाली मृत्यू टाळणे कठीण होऊन बसते. माझी ही व्यथा मी हॅनोइ, व्हिएटनाम येथे फेब्रुवारी २००१ मध्ये झालेल्या जीवनसत्व 'अ' च्या बैठकीत मांडली. जॉन्स हॉपकिन्स विश्वविद्यालयातील प्रो. डॉ. नेथन यांनी मला रक्ताच्या परिक्षेशिवाय - जीवनसत्व 'अ' ची कमतरता शोधता येते हे पटवून दिले. त्या उपकरणाचे नाव " Pipillometer" व त्याच्या खास कार्यशाळेसाठी त्यांनी मला अमेरिकेस फेब्रुवारी २००२ मध्ये बोलावून घेतले व नंतर हे उपकरण मला आदिवासी भागात कार्य करण्यासाठी भेट म्हणून दिले.



डॉ. टेकाळे- प्युपिलोमीटर या उपकरणासह

" Pipillometer" हे उपकरण दोन भागात एकमेकांस जोडलेले आहे. मुख्य भाग बॅटरी वर चालतो व त्यावर लाल अक्षरात १ ते १२ हा स्कोअर मिळतो. दुसरा भाग हा लेन्सच्या रुपात आहे. तो एका डोळ्यावर धरून दुसऱ्या डोळ्यातील Pupil (बुबुळ) ची परीक्षा करावयाची. दिवसा चांगला उजेड असतो तेंव्हा Pupil हे नेहमी आकुंचित अवस्थेत असते. ही क्रिया डोळ्याच्या आतील सूक्ष्म पडद्यावर असलेल्या रॉडस् नावाच्या पेशी नियंत्रित करतात. व्यक्ती अंधुक प्रकाशाकडे अथवा अंधारात गेली की दुसऱ्या पेशी ज्या रॉडसच्या जवळच असतात त्या जागृत होतात व त्यामुळेच आपणास अंधुक प्रकाशात सुद्धा दिसू लागते. कोन्सच्या या कार्यासाठी जीवनसत्व 'अ' ची नितांत गरज असते. जर जीवनसत्व 'अ' चा अभाव असेल तर 'कोन्स' काम करत नाही. त्यामुळे Pupil ची आकुंचन पावण्याची क्षमता नष्ट होते. व्यक्तीस अंधारात किंवा अंधुक प्रकाशात कांहीच दिसत नाही व यालाच आपण रातअंधळेपणा म्हणतो. (Night Blindness)

कोन्स 'अंधुक प्रकाशात काम करतात की करत नाहीत हे आपणास Pupil च्या आकुंचन पावण्याच्या क्रियेवरून चटकन समजते. Pipillometer नेमके याच तत्वावर आधारलेले आहे. व्यक्तीस अंधाऱ्याजागी ५ मिनिटे बसवतात. नंतर डोळ्यावर फ्लॅशचा प्रकाश सेकंदासाठी चमकवला जातो. यामुळे रॉडस् कार्यान्वित होतात- पण अंधार असल्याने त्यांची जागा कोन्स त्वरीत घेतात. याच वेळी एका डोळ्यावर लेन्स धरला जातो व त्यातून Infra red सेकंदाच्या काही भागासाठी डोळ्यात सोडतात. हे किरण येथे अंधुक प्रकाशाचे काम करतात. कोन्स या अंधुक प्रकाशास Response देतात की नाही हे लेन्सच्या बाजूला लावलेल्या लाल प्रकाशाच्या किरणातून Pupil चा अभ्यास करताना दिसून येतो. लाल प्रकाश म्हणजे अंधार हे येथे लक्षात घ्यावे. Pipillometer चा Score १ ते १२ पर्यंत आपणास वाढवता येतो. Infra red चे किरण टाकून नंतर

प्रत्येक वेळी एक ने Score वाढवता येतो. १ ते १२ या Score मध्ये Pupil Contraction आढळले तर जीवनसत्व 'अ' ची कमतरता नाही हे समजले जाते. जर १२ या अंकापर्यंत Pupil आकुंचन पावला नाही तर जीवनसत्व 'अ' ची कमतरता आहे हे नक्की समजावे. एका व्यक्तीच्या परीक्षेस अंदाजे ३ ते ४ मिनिटे लागतात. समूहात जीवनसत्वाची कमतरता आहे की नाही हे समजण्यासाठी हे उपकरण अतिशय उपयुक्त आहे.

हाताळण्यास सोपे व दुर्गम भागातही वापरण्यास येग्य ही याची वैशिष्ट्ये. या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर हवाच अशी गरज नाही. अनेक व्यक्ती, गरोदर स्त्रिया, माता, बालके यांचा Pipillometer च्या सहाय्याने अभ्यास करून त्या भागात जीवनसत्व 'अ' ची कमतरता आहे की नाही याचा अंदाज बांधता येतो.

( Population Study) माता, बालके, गरोदर स्त्रिया यांच्यावर योग्य उपचार करता येतात. व बालमृत्यूवर पूर्ण नियंत्रण ठेवता येऊ शकते.

**डॉ. नागेश टेकाळे,**
प्र. पाठक, वनस्पतिशास्त्र विभाग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

• • •

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक शिक्षण संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक)

२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक)

३) आनंदीबाई जोशी विद्यालय (प्राथमिक)

४) आनंदीबाई जोशी विद्यालय (माध्यमिक)

५) बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

६) के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय.

७) विधी महाविद्यालय

८) वि. प्र. मंडळाचे तंत्र निकेतन

९) व्यवस्थापन अभ्यास संस्था

१०) प्रगत अभ्यास संस्था (Advance Study Centre)



# आधुनिक काळातील खरी शोषित - स्त्री

*'स्त्री' हा पुरुषप्रधान समाजाने उपेक्षित ठरवलेला विषय. दुर्दैव असे की काही स्त्रियाही या स्थितीला कारणीभूत असतात. या बद्दलचे हे विचार. - संपादक*

मानवाच्या आजवरच्या इतिहासाचे आपण जर नीट अवलोकन आणि परिशीलन केले, तर एक गोष्ट आपल्याला प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे मानवाने मानवावर हर प्रकारे जुलूम, अन्याय केलेला आहे. त्याचे शोषण केलेले आहे. त्यामध्ये हरिजन, गिरिजन, आदिवासी, दलित यांचे शोषण शतकानुशतके होत आलेले आहे. अमेरिकेसारख्या देशामध्ये नीग्रो गुलामांची वर्णभेदामुळे आणि गुलामगिरीमुळे पिळवणूक झालेली आहे. परंतु सर्वाधिक शोषण जर कुणाचे झालेले असेल, तर ते म्हणजे निसर्गतःच अबला असलेल्या स्त्रीचे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत स्त्री कोणत्याही देशातील असो, कोणत्याही धर्माची असो, कोणत्याही आर्थिक, सामाजिक वा सांस्कृतिक स्तरातील असो, तिचे कमी जास्त प्रमाणात शारीरिक, भावनिक, मानसिक, आर्थिक शोषण होत आलेले आहे. याला पुष्टी देणारे भरपूर पुरावे अखिल मानवजातीच्या इतिहासामध्ये जागोजागी विखुरलेले आहेत. फक्त त्याकडे डोळस आणि सहृदय दृष्टीने पहाण्याची वृत्ती आपल्याकडे असायला हवी.

आदिम काळापासून स्त्रीपुरुष असमानता आपल्याला आढळून येते. स्त्रीवर निसर्गानेच मातृत्वाची आणि अपत्य संगोपनाची जबाबदारी सोपविल्यामुळे तिच्या नैसर्गिक स्वातंत्र्याला आपोआपच काही मर्यादा पडल्या. शिकार करणे वगैरे घराबाहेरील उदरभरण्याची कामे प्रामुख्याने पुरुषाकडे आली. त्यानंतर मानव स्थिर झाल्यानंतर आणि शेती करु लागल्यावर देखील कामाची विभागणी साधारण तशीच राहिली. त्यातूनच स्त्री-पुरुष विषमता आणि पुरुषी वर्चस्व निर्माण झाले. पुरुषप्रधान समाजाकडे मानवजातीची वाटचाल चालू झाली.

आपल्याकडचा वैदिक काळ सोडला, ज्या काळामध्ये गार्गी, मैत्रेयी सारख्या स्त्रिया पुरुषांशी वाक्सभामधून वादविवाद करु शकत होत्या,स्त्रीला स्वयंवराची म्हणजे स्वतःचा पती स्वतःच निवडण्याचा अधिकार होता, तर स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्थान कधीच नव्हते. वैदिक काळ स्त्री-स्वातंत्र्याच्या दृष्टीने सुवर्णकाळ होता. 'न स्त्री स्वातंत्र्यं अर्हति' ह्या मनुप्रणित विचारसरणीचा पगडाच जनमानसावर शतकानुशतके राहिलेला आहे. आणि स्त्रीच्या संरक्षणाच्या नावाखाली तिच्यावर विविध बंधने लादण्यात आली आणि तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करण्यात आला. आणि तिला पुरुषांच्या गुलामगिरीत ढकलण्यात आले.

रामायणात गौतमपत्नी अहिल्येचे उदाहरण आहे. तिच्या चारित्र्याचा संशय घेऊन गौतमऋषींनी ' तू साठ हजार वर्षे शिला होऊन पडशिल' अशी शापवाणी उच्चारली आणि तिच्या एवढाच दोष असलेल्या देवेंद्रला उःशापामुळे सहस्र डोळ्यांची प्राप्ती झाली. हे कशाचे द्योतक आहे? स्त्री-पुरुषांच्या एकाच अपराधाकडे भिन्न दृष्टिकोनातून बघण्याची मानसिकता दिसत नाही का ? पंचकन्यांमध्ये जिचा समावेश आहे, जिच्या प्रातःस्मरणात पतिव्रता म्हणून गौरव केला जातो, त्या सीतेच्या नशिबीसुद्धा काही वेगळे भोग आले नाहीत. रावणाने पळवून नेली आणि आपल्या बंदिवासात ठेवली, म्हणून तिच्या पावित्र्याबद्दल, शीलाबद्दल सामान्य भोव्यापासून

प्रत्यक्ष रामापर्यंत सर्वांनीच संशय घेतला. सीतेला स्वतःच्या निष्कलंक चारित्र्याची आणि पवित्र शीलाची खात्री पटवून देण्यासाठी 'अग्निदिव्य' करावे लागले. तरी तिच्या नाशिबी परित्यक्तेचे जीवन आणि पुनश्च वनवासाचे दुःख आलेच. प्रजाहितदक्ष, जनमताची चाड असणारा, लोककल्याणकारी राजा अशी रामाची प्रतिमा जनमानसामध्ये निर्माण झाली. पण त्याचीच अर्धांगिनी असलेल्या, गृहस्वामिनी सीतेचे काय ?

महाभारतामध्ये देखील अनेक उदाहरणे आहेत. शाल्वाशी लढाई करून भीष्माने अंबा, अंबिका आणि अंबालिका ह्या तीन राजकन्या जिंकल्या. पण स्वतःसाठी नव्हे, तर हस्तिनापुरचा स्वामी विचित्रवीर्यासाठी. त्यांच्या भावनांशी खेळण्याचा भीष्माला काय अधिकार होता ? पांच पांडवांची पत्नी असलेल्या द्रौपदीची स्थिती काही याहून वेगळी नाही. अर्जुनाने पणात जिंकलेल्या द्रौपदीला केवळ कुंतीच्या इच्छेखातर पाच पांडवांची पत्नी व्हावे लागले. मातृभक्त पांडवांनी मातृप्रेमाखातर का होईना नारदमुनींनी सुचविलेला ह्या तडजोडीला मान्यता दिली. जणू काही मालमत्ता असल्याप्रमाणेच तिची वाटणी करण्यात आली. आणि ती पाच पांडवांची स्वामिनी नव्हे गुलाम बनली. गुलामाला स्वातंत्र्य नसते, गुलाम ही मालमत्ता असते, या विचारसरणी प्रमाणेच युधिष्ठिराने कौरवांशी द्यूत खेळताना द्रौपदीला पणाला लावले आणि ते देखील इतर पांडवांचा विचार न घेता. ह्या सर्व गोष्टी कशाच्या द्योतक आहेत? 'पुराणातील वांगी पुराणात' असे म्हणून जरी आपण ह्या गोष्टी सोडून दिल्या, तरी त्यावरून त्या त्या काळातील स्त्रीविषयक दृष्टिकोनावरच प्रकाश पडत नाही का?

मध्ययुगीन काळात स्त्रीची सामाजिक स्थिती आणखीनच खालावली. अनेक परकीय आक्रमकांनी हिंदुस्थानवर आक्रमण केले, ज्यामध्ये मोगल प्रामुख्याने होते, आणि जेत्यांनी जितांवर अन्याय करणे हा अलिखित नियम असल्यामुळे त्यामध्ये स्त्रियांवर अत्याचार करणे वगैरे गोष्टी ओघानेच आल्या. ह्यातून बालविवाहाच्या प्रथेला सुरुवात झाली. पतीच्या निधनानंतर आपली विटंबना होऊ नये, आपल्या शीलावर घाला पडू नये, म्हणून राजघराण्यातील राजपूत स्त्रिया 'जोहार' करु लागल्या. पतिव्रत्याला, स्त्रीच्या अहेवपणी मरण्याला अवास्तव महत्व प्राप्त झाल्यामुळे, विधवेचे हलाखीचे जिणे जगण्यापेक्षा स्त्रिया पतीबरोबर सहगमन करु लागल्या. त्यातूनच सतीची दुष्ट, अनिष्ट प्रथा सुरु झाली. 'चूल आणि मूल' हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र ठरविले गेल्यामुळे 'तिला शिक्षणाची गरजच काय' ह्या दृष्टिकोनातून तिला आर्थिकदृष्ट्या पुरुषावलंबी बनविण्यात आले. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, हुंड्याची आणि केशवपनाची दुष्ट प्रथा, या सर्व गोष्टी पुरुषप्रधान समाजाच्या स्त्रिविषयक विकृत दृष्टिकोनाच्या आणि भेदभावाच्या परिपाक आहेत.

युरोप, अमेरिकेसारख्या प्रगत देशांमध्ये देखील याहून काही वेगळे चित्र दिसत नाही. जेथे लोकशाही जन्माला आली, त्या इंग्लंमध्ये, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, रशिया इ. प्रगत देशांमध्ये देखील स्त्रियांना एकोणिसाव्या-विसाव्या शतकापर्यंत मतदानाचा अधिकार नव्हता. तर इतर अर्थविकसित किंवा विकसनशील देशांचे काय? हुंड्यासाठी आजही स्त्रियांचा सासू, नणंद, दीर, नवरा ह्या सर्वांकडून शारीरिक आणि मानसिक छळ केला जातो. तिला जिवंत मारले जाते किंवा काही वेळेस स्वतःला जाळून घेऊन, तिला आत्महत्या करावयास भाग पाडले जाते. स्वतःला सुशिक्षित म्हणविणारे देखील आईवडिलांच्या आडून का होईना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या हुंड्याची अपेक्षा बाळगतात. प्रेमविवाह करणारे देखील काही वेळेस मानपानाच्या नावाखाली भेटवस्तूंची अपेक्षा करतात. याचे कारण म्हणजे स्त्रीकडे एक वस्तू, मालमत्ता म्हणून आणि उपभोगाचे एक साधन म्हणून पाहिले जाते, हेच आहे. आदिवासी सारख्या काही मागास समाजमध्ये उलट

वराकडून हुंडा घेतला जातो. म्हणजे थोडक्यात मुलगी विकली जाते. मध्यंतरी एक पत्रकाराने मध्यप्रदेशमधून केवळ ९००रु. ना एका स्त्रीला विकत आणून हेच सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केला होता की, अजूनही स्त्रियांचा व्यापार चालतो. ज्यामध्ये तिला भेडबकरीपेक्षा कमी भाव मिळतो. आणि अशा विकत आणलेल्या स्त्रिचे सामाजिक स्थान आणि तिचे भवितव्य काय ? काही आदिवासी समाजांमध्ये तर स्वतःच्या पत्नीला देखील काही वर्षांनी विकून टाकून पुन्हा विवाह करण्याची प्रथा सर्रास आहे. वेश्या व्यवसायासाठी नेपाळमधून किंवा अन्य ठिकाणांहून विकत किंवा जबरदस्तीने पळवून अल्पवयीन मुली मुंबईसारख्या ठिकाणी आणल्या जातात किंवा दुबईसारख्या आखाती प्रदेशामध्ये पाठविल्या जातात, ही गोष्ट सर्वश्रुत आहे.

मूल नसलेल्या स्त्रीला समाजामध्ये अजूनही 'वांझ' म्हणून हिणवले जाते. तिची हेटाळणी केली जाते. ह्या गोष्टीला बऱ्याच वेळा नवरा जबाबदार असण्याची शक्यता असते. पण स्त्रीच्या वाट्याला लांछिवाणे जिणे येते. स्त्री पुरुष समानतेचा आपण कितीह उदोउदो केला तरी अजूनही 'वंशाला दिवा म्हणून मुलगा हवा' अशी विचारसरणी ग्रामीण भागामध्ये आणि शहरी भागामध्ये, सुशिक्षितांमध्ये देखील कमी अधिक प्रमाणात आहे, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. एखाद्या स्त्रीला मुलीच होत असतील तर तिला त्याबद्दल कुटुंबियांकडून दोषी धरले जाते. वास्तविक गर्भाची लिंगनिश्चिती पुरुषांमुळे होत असते, हे वैज्ञानिक सत्य आहे. गर्भजल चिकित्सा करून गर्भाचे लिंगनिदान करून घेणे आणि गर्भ मुलीचा आहे हे कळल्यानंतर गर्भपात करून घेणे हे कशाचे लक्षण आहे ? स्त्रीपुरुष भेदभाव आपल्या मनामध्ये इतका रुजलेला आहे की, स्वतःच्या मुलांना वाढविताना देखील कळत नकळत मुलगा-मुलगी असा भेदभाव केला जातो. आणि मुलीचे संगोपन करताना तिचे पोषण, आरोग्य, शिक्षण या बाबतीत दुय्यम प्राधान्यक्रम असतो. त्यामुळे तिच्यावर कळत नकळत अन्याय केला जातो. विधवा स्त्रियांना अजूनही धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये स्थान दिले जात नाही. कारण आपल्या पुरुषप्रधान समाजाच्या, स्त्री विषयक शुभाशुभ कल्पना तिच्या सवाष्णपणाशी म्हणजेच पर्यायाने पुरुषाशी निगडित आहेत. आणि या बाबतीत स्त्रिया देखील आपल्या सारख्याच एका स्त्रीला भेदभावाची वागणूक देताना अग्रभागी दिसतात. यासारखे स्त्रीचे नष्टचर्य ते कोणते?

स्त्रियांना रोजगाराच्या बाबतीत देखील स्त्री-पुरुष विषमतेचा विदारक अनुभव येतो. पुरुषांची मजुरी आणि स्त्रियांची मजुरी ह्यामध्ये अजूनही ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये देखील भेदभाव केला जातो, केवळ स्त्री म्हणून एरवी दोघांचे कामाचे स्वरूप एकच असते. महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी कर्वे, ईश्वरचंद्र विद्यासागर इ. समाज सुधारकांच्या आणि समाजसेवकांच्या प्रयत्नामुळे स्त्रिया शिकू लागल्या. पुरुषांच्या बरोबरीने काम करू लागल्या. आणि आज आपण पाहतोच आहोत. सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रिया कार्यक्षमतेने काम करत आहेत. परंतु तरीही काही वेळेस वरिष्ठ प्रशासकीय पदाच्या बाबतीत, व्यवस्थापकीय पदाच्या बाबतीत स्त्रियांचा विचार केला जात नाही. त्यांच्या कार्यक्षमतेकडे संशयाच्या नजरेने पाहिले जाते. हा लिंग भेदच नव्हे का ? एक नैसर्गिक, शारीरिक शक्तीमधील असमानता सोडली, तर स्त्री बुद्धी, मानसिक क्षमता आणि इतर कार्यक्षमता सर्व बाबतीत पुरुषांपेक्षा तसूभरही कमी नाही. हे विज्ञानाने सिद्ध केलेले सत्य आहे आणि त्याची प्रचिती आपल्याला जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये येत असते.

स्त्रीचे आजवर शोषण होत राहिले. पुरुषाच्या मालमत्तेचा एक भाग म्हणून स्त्रीकडे पाहिले गेले. कधी पातिव्रत्याच्या खुळचट कल्पनांच्या आहारी जाऊन तिला देवत्व बहाल करण्यात आले. तर कधी तिला पुरुषाची

दासी, बटीक, पायातली वहाण, समजून वागविण्यात आले. त्यामुळे स्त्रीचे 'येन केन प्रकारेण' शोषण चालूच राहिले. त्यातूनच वेश्याव्यवसाय, अल्पवयीन कुमारिकांवर होणारे बलात्कार, एकतर्फी प्रेमाचे प्रकार आणि त्यातून होणारी स्त्रीची हत्या या सर्व गोष्टी घडत असतात. बस, ट्रेन या सारख्या वाहनातून प्रवास करताना किंवा गर्दीच्या ठिकाणी आंबट शौकिनांकडून स्त्रियांना मुद्दाम दिले जाणारे धक्के, किंवा सहेतुक केला जाणारा, वासनेने भरलेला स्पर्श, नोकरीच्या ठिकाणी बॉसकडून किंवा सहकाऱ्याकडून केली जाणारी शारीरिक किंवा शाब्दिक लगट, जाहिरातीमध्ये आणि चित्रपट, दूरदर्शनवरील मालिका, ह्यामधून केले जाणारे अनावृत किंवा अर्धअनावृत स्त्री देहाचे प्रदर्शन, विविध सौंदर्यस्पर्धा, विविध नियतकालिकांची मुखपृष्ठे आणि सिनेमांची पोस्टर्स काय दर्शवितात? हे स्त्रीचे लैंगिक शोषणच नव्हे काय ? अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन ह्यांचे मोनिका लेविन्स्की प्रकरण सर्वांना माहीत आहेत. अर्थात ह्याला पुरुषांच्या बरोबरीने स्त्री देखील तेव्हढीच जबाबदार आहे, हे सत्य स्त्रिया नाकारू शकतील काय ?

स्त्रीचे आर्थिक शोषण तर पिढ्यान पिढ्या, शतकानुशतके चालू आहे. एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्री उदरभरणासाठी पुरुषावरच अवलंबून होती. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या परावलंबी होती. स्त्रियांचे घरकाम आर्थिकदृष्ट्या अनुत्पादक असल्यामुळे अजूनही 'काम' समजले जात नाही. एका पाहणीमध्ये असे आढळून आलेले आहे की, ग्रामीण भागामध्ये शेतकरी किंवा मजूर स्त्रिया ह्या ५७% काम करत असतात. परंतु त्याचा आर्थिक मोबदला त्यांना किती मिळतो ? स्त्री पुरुषांच्या मजुरीमध्ये अजूनही भेदभाव केला जातो. शेतकऱ्याला स्त्री अर्थार्जनामध्ये हातभार लावत असली, तरी आर्थिक व्यवहारामध्ये तिला काडीचेही स्थान नसते. सर्व आर्थिक गोष्टी कुटुंबप्रमुख ह्या नात्याने घरातील पुरुषच पहात असतो. परिणामी स्त्रीचे घरातील स्थान अती गौण, दुय्यम दर्जाचेच असते.

शहरी भागामध्ये देखील ह्याहून वेगळे, आशावादी चित्र नाही. विसाव्या शतकामध्ये सुशिक्षित स्त्रिया घराबाहेर पडल्या, व्यावसायिक जगामध्ये त्यांनी प्रवेश केला, विविध पदे त्या भूषवू लागल्या, विविध क्षेत्रांमध्ये नोकऱ्या करून अर्थार्जन करुन, त्या संसाराला हातभार लावू लागल्या. परंतु त्यामुळे त्यांचे घरातील आर्थिक स्थान बदलले का ? अजूनही काही घरांमध्ये पगार झाला की, तो तिला नवऱ्याच्या स्वाधीन करावा लागतो. अशी स्थिती आहे. स्त्री पैसा मिळवणार, पण तो स्वतःच्या मनाप्रमाणे खर्च करण्याचे स्वातंत्र्य तिला नाही. उलट घर आणि नोकरी ह्या दोन्ही आघाड्यांवर तिची कसरत चालू असते. आणि त्यामध्ये तिची शारीरिक, भावनिक आणि मानसिक कुचंबणा होत असते. स्त्रीने अर्थार्जन करावे, ह्याबरोबरच तिने संसार देखील नीट करावा, घरकाम, मुलांचे संगोपन, त्यांचे आरोग्य, शिक्षण, संस्कार या गोष्टींकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा पुरुष बाळगून असतो. खरे ह्या कार्यामध्ये जीवनसहचर, सहकारी म्हणून त्याचे सहकार्य काडीमात्रही नसते. कारण पुरुषी मानसिकता, पुरुषी अहंभाव आणि नवरेशाहीवृत्ती त्याच्या आड येते. वास्तविक नवऱ्याने घरकामामध्ये थोडी-फार जरी मदत केली तरी त्याचे बायकांना अप्रूप असते. याचा अनुभव मी स्वतः बऱ्याचवेळा घेतलेला आहे. काही समंजस नवऱ्यांनी मानसिकता हळू हळू बदलत आहे. परंतु त्याचे प्रमाण जवळजवळ नगण्य आहे. काही सन्माननीय अपवाद सोडले तर गरिबांपासून श्रीमंतापर्यंत, अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत, कोणत्याही जातीच्या, धर्माच्या घरामध्ये कमी जास्त प्रमाणात नवरेशाहीचे प्रतिबिंब पडलेले दिसते आणि आदिम काळापासून आजच्या एकविसाव्या शतकात देखील स्त्रीचे समाजातील गौण स्थान तिला मिळणारी दुय्यम दर्जाची वागणूक आणि तिचे विविध प्रकारे होणारे

शोषण ह्या विदारक सत्याचा प्रत्यय येतो.

हे चित्र कधी पालटेल का ? त्यासाठी संपूर्ण समाजाची पुरुषप्रधान मानसिकता बदलणे गरजेचे आहे. सर्व पुरुषांनी नवरेशाहीवृत्तीचा त्याग करून स्त्रीला आपल्या बरोबरीने स्थान दिले पाहिजे. एक व्यक्ती म्हणून स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करायला शिकले पाहिजे. त्याचप्रमाणे स्त्रियांनी देखील आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून, पुरुषांचे अंधानुकरण न करता, स्त्रीमुक्तीच्या आक्रमक आणि अव्यवहार्य कल्पनेला बळी न पडता, स्त्रियांवरील अन्यायामध्ये कळत नकळत, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी न होता, पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहिले पाहिजे, तर चारही पुरुषार्थ साध्य करण्यामध्ये वाटेकरी असलेली स्त्री खऱ्या अर्थाने पुरुषाची जीवन सहचरी, सखी होऊ शकेल.

श्री. प्रभाकर अरदकर
३०२, 'शिवदर्शन', शिवाजी नगर,
दुसरी राबोडी, ठाणे - ४०० ६०१.

•••

## १५ मे
## जागतिक कुटुंब दिन

कुटुंब व्यवस्थेसमोरील आव्हाने लक्षात घेता, जगभर हा दिवस कुटुंबदिन म्हणून साजरा करण्यात आला.

## विद्याप्रसारक मंडळाची वेबसाईट

http://www.vpmthane.org या आमच्या साईटवर मंडळाच्या सर्व घटक संस्थांची महत्त्वाची माहिती उपलब्ध आहे. काही घटक संस्थांचे काही तपशील अजून बाकी असल्याने काही भाग Under Constructions आहे. पण महाविद्यालयातील अभ्यासक्रम, प्रवेश, प्रक्रिया, नियम, विभाग आदी माहिती प्रवेश घेऊ इच्छिणारांना इंटरनेटवर उपलब्ध आहे.

*****

# पारिभाषिक शब्दांचा अर्थ

*माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात वारंवार वापरले जाणारे शब्द, त्यांचे अर्थ यांची कल्पना यावी या दृष्टीने ही संकलित यादी क्रमश: देत आहोत. असे पारिभाषिक शब्द वापरताना त्यांचा अर्थ माहीत व्हावा हा त्यामागील उद्देश आहे या विषयाप्रमाणेच जीव तंत्रशास्त्रातील पारिभाषिक शब्द देण्याचा आमचा मानस आहे- संपादक*

**Account Name - अकौंट नेम**

इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर प्रत्येकासाठी वेगवेगळे अकौंट उघडतो व त्यावर अकौंटला नाव देतो. हे नाव कळवून तुम्ही त्या प्रोव्हायडरशी तेथून पुढे केव्हाही संपर्क साधू शकता.

**Access - ॲक्सेस**

इंटरनेटवरच्या संगणकाशी संपर्क साधणे म्हणजेच तुम्हाला ॲक्सेस मिळणे. हा संपर्क प्रत्यक्ष असतो तेव्हा तुमचा संगणक नेटवरचा एक जोड बनतो.

**Address - ॲड्रेस**

इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडरला तुमचा म्हणून जो संकेत शब्दातील पत्ता कळवाल त्या पत्त्याने तुम्हास इंटरनेटवर ओळखले जाईल.

**Analong - ॲनलॉग**

सतत बदलत राहणाऱ्या राशीच्या स्वरुपात दर्शविण्यात येणारी माहिती. उदा. विद्युतप्रवाह, विद्युत दाब, तापमान वगैरे राशी सतत बदलणाऱ्या आहेत.

**Anonymous ftp- ॲनॉनिमस एफ्टीपी**

अतिदूरच्या एखाद्या संगणकावरील (होस्ट कॉम्प्युटर) फाईल नि:शुल्क मिळण्याची व्यवस्था

**Aol - एओएल्**

हा अमेरिका ऑन लाईनचा शॉर्टफॉर्म आहे. 'Aol' हा एक अमेरिकेतील सार्वजनिक इंटरनेट प्रोव्हायडर आहे.

**Archie - आर्ची**

विशिष्ट फाईल असलेल्या ॲनॉनिमस् एफ्टीपी स्थानांना शोधून देणारी इंटरनेटवरील एक सेवा.

**Arpanet - अर्पानेट**

Advance Research Projects Agency Network या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. अमेरिकेच्या संरक्षण खात्याने प्रारंभ केलेले नेटवर्क. त्यातूनच पुढे इंटरनेटचा विकास झाला.

**Archive - आर्काईव्ह**

ऐतिहासिक कागद पत्रांचा संग्रह साठवायला सोपे जावे म्हणून केलेली अनेक फाईल्सची कॉम्प्रेस्ट फाईल.

**ASCII - ॲसकी**

American Standard Code for information interchange या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. इंग्रजी भाषेतील सर्व अक्षरे, चिन्हे, आणि अंक यांना विशिष्ट संख्या देऊन तयार करण्यात आलेली सांकेतिक पद्धत (Code).

**ASCII File - ॲसकी फाईल**

केवळ मजकुराचा अंतर्भाव असलेली फाईल

**A T & T Mail - ए टी ॲन्ड टी मेल**

पत्रव्यवहाराची परदेशात सेवा पुरवणारे अनेक

खाजगी प्रोव्हायडर्स A T & T Mail आहेत हे त्यातील एकीचे नावं.

**Backbone - बॅकबोन**

अमेरिकेतील महत्त्वाच्या लोकल एरिया नेटवर्कना जोडणारा अत्यंत गतिमान सांधा.

**Bulletin Board System - बुलेटिन बोर्ड सिस्टिम**

ह्या पद्धतीत तुम्ही इतरांना तुमचे निरोप देऊ शकता व इतरांचे घेऊ शकता. न्यूजग्रुपची युजनेट सिस्टिम जगात सर्वात जास्त वापरली जाणारी एक इलेक्टॉनिक Message पद्धती उर्फ बीबीएस् आहे.

**Binary File - बायनरी फाईल**

ज्या फाईलमधील माहिती निव्वळ मजकुराच्या स्वरूपातील नसून शून्य व एक या द्विमान पद्धतीत लिहलेली असते. विशिष्ट प्रोग्रॅमद्वारे या फाईलचा अर्थ लावणे आवश्यक असते.

**Bit - बिट**

संगणकाच्या स्मृतीमधील सर्वात लहान एकक याची किंमत शून्य किंवा एक असते.

**Boot - बूट**

संगणक कार्यान्वित करणे.

**Bridge - ब्रीज**

समजा दोन भिन्न नेटवर्क्स आहेत. तुम्हाला ती जोडून एक सलग नेटवर्क म्हणून सेवा देतील असे करायचे आहे. त्यासाठी तुम्ही जे कराल त्यालाच Bridge म्हणायचे.

**Browser - ब्राउझर**

जनावरांचे चरणे म्हणजे ब्राउझिंग. इंटरनेटवरील माहिती मिळवून देणारा क्लायंट प्रोग्रॅम.

**CD. Rom - सीडी - रोम**

Compact Disk Read Only Memory या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. एका CD. Rom ची संग्रह क्षमता मेगा बाइट एवढी प्रचंड असू शकते.

**Chameleon - चॅमेलिऑन**

हे एक विंडो सॉफ्टवेअर होय. यामुळे तुम्ही इंटरनेटशी जोडले जाऊ शकता. Serial Line internet protocol (SLIP) Pointto Point Protocol (PPP) प्रकारचे तुमचे इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर अकौंट असेल तर हे सॉफ्टवेअर उत्तम आहे.

**Chat - चॅट**

एकाच वेळी अनेक व्यक्तींशी संभाषण करून देणारी इंटरनेटवरील सेवा.

**Client - क्लायंट**

सर्व्हरवरील माहिती तुमच्या संगणकापर्यंत आणून पोहोचविणारा व तुमचा संदेश सर्व्हरपर्यंत पोहोचविणारा प्रोग्रॅम.

**Demodulate - डिमॉड्युलेट**

ॲनालॉग माहितीचे डिजिटल माहितीत रुपांतर.

**Data Base - डाटा बेस**

साऱ्या जगातील एकूण एक ज्ञानाच्या संग्रहाचा उल्लेख करायचा असेल तर Data Base हा शब्द वापरतात.

**Directory - डिरेक्टरी**

अनेक फाइल्सचा संग्रह.

**Domain Name Server (DNS) - डोमेन नेम सर्व्हर**

इंटरनेटला जोडलेल्या प्रत्येक संगणकाला एक डोमेन नेम असतेच. इंटरनेटवरच्या डोमेन नेमच्या अंकामध्ये अनुवाद करून देणाऱ्या इंटरनेटवरच्या संगणकाला डोमेन नेम सर्व्हर म्हणतात.

**Domain - डोमेन**

इंटरनेट अॅड्रेसमधील कॉम्प्युटरचे नाव दर्शविणारा विभाग.

**Down Load - डाऊन लोड**

दूरच्या संगणकावरील माहिती आपल्या संगणकावर संग्रहित करून घेणे.

**Easy Link - इंझी लिंक**

ही एक E-mail सेवा आहे. ही A T & T तर्फे अमेरिकेत ग्राहकांना दिली जाते.

**Edura - एड्युरा**

हा एक ई-मेलची सुविधा सुलभ करण्यासाठी म्हणून तयार केलेला प्रोग्रॅम आहे. हा मॅकिनटॉश व विंडोज वर चालतो.

**E du - ए ड्यु**

शैक्षणिक संस्था निर्देशक Short form. अमेरिकेतील अशा संस्थांच्या नावाचा शेवट या शब्दाने होतो.

**Emulae - एम्युलेट**

एखाद्या हार्डवेअर डिव्हाइसचे कार्य करण्याचे सोंग आणणारा प्रोग्रॅम.

**E-Mail - ई-मेल**

इंटरनेटवरील E-Mail द्वारे लिहिलेले पत्र सहस्त्रावधी किलोमीटर्स प्रवास करूनही क्षणार्धात Elecrotnic व इंटरनेट माध्यमातून पोहोचू शकते. या E-Mail पत्ता घराच्या पत्त्यासारखा नसतो. घर नंबर वगैरे देऊन चालत नाही. त्या पत्त्याच्या अर्ध्या भागात User Name उर्फ ग्राहकांचे नांव, अर्ध्या भागात डोमेन चे नाव व डोमेन नंतर देशाच्या नावाचा शॉर्टफॉर्म येईल. जसे ऑस्ट्रेलिया - AU, इंडिया -In. मध्यावरचे विभागणी चिन्ह @ असे दिसेल. केवळ ई-मेल सुविधा मिळू शकते. इंटरनेट सुविधा घेणाऱ्यास ई-मेल आपोआप प्राप्त होते.

**E-Mail Discussion Lists - ई-मेल डिसकशन लिस्ट**

तुमचा संदेश तुम्ही जेव्हा मेलिंग लिस्टला पाठवाल तेव्हा तो संदेश आपोआप ग्रुपच्या सर्व सदस्यांना जाईल. अशा खूपशा मेलिंग लिस्टस् BIT NET साईटवर LISTSERV या सॉफ्टवेअर द्वारा उपलब्ध आहेत.

**Fax Modem (Fax Data Modem) - फॅक्स मोडेम**

फॅक्स संदेश तुम्ही जेव्हा तुमच्या कॉम्प्युटरच्या साहाय्याने पाठवलात तर तो जसाच्या जसा तसा पुढे पाठवायचे काम हे वेगळे फॅक्स मोडेम जादा काम म्हणून करते.

**FAQ - एफ् अे क्यू**

Frequently Asked Questions या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर, विशिष्ट विषयावरील मूलभूत प्रश्नांची मालिका व त्या प्रश्नांची उत्तरे. इंटरनेटवर विविध विषयांची प्रश्नोत्तरे उपलब्ध आहेत.

**File - फाईल**

काहीतरी नाव असलेला माहितीचा संग्रह.

# परिसर वार्ता

**आगळा वेगळा निरोप समारंभ :**

शुक्रवार दिनांक २२-३-२००२ रोजी पूर्व प्राथमिक विभागातील मोठा शिशु वर्गाला आगळावेगळा निरोप समारंभ देण्यात आला. निरोप समारंभ शाळेत साजरा न करता या दिवशी २७६ मुलांना मासुंदा तलावपाळी येथे दुपारी २.३० वाजता नेले. त्यानंतर मुलांना सजवलेल्या बग्गीत बसवून मासुंदा तलावाला पूर्ण फेरी केली.



टांग्यात मजा करताना लहान मुले.



छोट्यांचे नौकाविहार

तसेच सर्व मुलांना नौकेतून फिरविण्यात आले. तेव्हा मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसडून वाहत होता. मुलांना बसवण्याची व्यवस्था नौका-विहाराचे मुख्य श्री. हेमंत ठाणेकर यांनी केली. नौकेतून फिरून आल्यावर मुलांना भेळ देण्यात आली. मासुंदा तलावाच्या आजुबाजुच्या सर्व गोष्टी मुलांना पहाता आल्या. (उदा. गडकरी रंगायतन, शिवजींचा पुतळा, तलावातील शंकराचे मंदिर) या दिवशी मुले जेव्हा आई-बाबांबरोबर घरी जायला निघाली तेव्हा या कार्यक्रमाचे वर्णन त्यांना भरभरून सांगत होती. अन यातच आम्हाला या उपक्रमाच चीज झाल असं मनापासून वाटलं. या उपक्रमाला बग्गीवाले पाटील, तसेच तलावपाळी पर्यंत मुलांना नेण्या-आणण्याची व्यवस्था करणारे रिक्षाचालक श्री. पाठकजी व श्री. गंगाराम कदम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या समारंभाला श्री. वैद्य सर देखील उपस्थित होते. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा समारंभ खूपच छान साजरा झाला.

**होळी :**

गुरुवार दिनांक २८-३-२००२ रोजी पूर्व प्राथमिक विभागातील शिशु वर्गांची 'होळी' डॉ. बेडेकर विद्या मंदिरच्या प्रांगणात साजरी करण्यात आली. संध्याकाळी ६.३० ते ७.३० या वेळात साजरी करण्यात आली. शाळेच्या प्रांगणात खड्डा खणून होळी उभारण्यात आली होती व भोवताली रंगीत रांगोळी काढण्यात आली होती. सुवासिनींच्या वेषात छान साड्या नेसून, दागिने घालून मुली सजून आल्या होत्या. पूजेसाठी सोवळं नेसलेले २ बालपुजारी आणि खास पूजा सांगण्यासाठी श्री. श्रीधर केळकर भटजी बोलावले होते. मुलांच्या हस्ते होळी पेटविण्यात आली. होळीला पुरणा-वरणाचा नैवेद्य असा सर्व थाट केला होता. या कार्यक्रमाला माननीय महापौर सौ. शारदा राऊत उपस्थित होत्या. हा सर्व समारंभ पाहून



होळीचे दृश्य !

त्या खूपच भारावून गेल्या होत्या. होळीच्या दिवशी सुरेख रांगोळी काढून, उदबत्तीच्या सुवासात, सनईच्या सुरात अशा मंगलमय वातावरणात पुरणपोळी व बटाट्याची भाजी असा खाऊ देऊन मुलांची पगंत बसविण्यात आली. पालक वर्गही या कार्यक्रमाला उपस्थित होता. मुख्याध्यापिका, सर्व शिक्षिका व सेविका तसेच पालकांचे सहकार्य यामुळेच हा कार्यक्रम साजरा झाला. पालकांनी होळीच्या या कार्यक्रमाचा खूप छान अभिप्राय दिला.

**'व्हेच्युरा-२००२'स्पर्धेत विद्या प्रसारकच्या तंत्रनिकेतनचे यश :**

नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतर तंत्रनिकेतन प्रकल्प 'व्हेंच्युरा-२००२' या स्पर्धेत ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतनातील तृतीय वर्षाच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीमच्या विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिकल विभागात प्रथम क्रमांकांचे पारितोषिक पटकावले.

नवी मुंबई येथील भारती विद्यापीठ (बी.व्ही. आय.टी.) ने ७ फेब्रुवारी रोजी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

ह्या स्पर्धेसाठी विविध तंत्रनिकेतनांचे सुमारे ५० प्रकल्प आले होते. 'जिब क्रेन वुईथ इलेक्ट्रोमॅग्नेटिक हूक' हे विजेत्या प्रकल्पाचे नाव असून, यात शैलेंद्र मोहिते(गटप्रमुख), सचिन काठे (उपसहाय्यक), अमित कोरलेकर, अविनाश टाकळकर, शोभा नागर व दीप्ती नागवेकर या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

या प्रकल्पात स्मिता आचार्य (अधिव्याख्याता) व निशा वडेर (विभागप्रमुख) यांचे मार्गदर्शन लाभले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर व उपाध्यक्ष, एस.व्ही. करंदीकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हा प्रकल्प इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीमच्या विभागात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**प्रज्ञा शोध परिक्षेसाठी शिबीर संपन्न**

शालेय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्लीतर्फे आयोजन केले जाते. त्यात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक शिष्यवृत्ती बहाल केली जाते. त्यात राज्यपातळीवरील चाचणी परिक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे एक विशेष शिक्षण शिबीर 'राज्य शिक्षण संस्था' रविनगर, नागपूर यांच्यातर्फे दरवर्षी आयोजित केले जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे व प्रज्ञाशोध परिक्षेत त्याना यश मिळावे यासाठी हे शिबीर आयोजित केले जाते. यावर्षी हे शिबीर ठाणे (पूर्व) येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेत गेले १० दिवस संपन्न झाले.

या शिबीरात तज्ज्ञ शिक्षक म्हणून आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील प्रा. संजय जोशी (जीवशास्त्र), प्रा. राजीव लेले (पदार्थ विज्ञान) यांचा इतर शिक्षकांबरोबर मार्गदर्शनासाठी सहभाग होता.

**कार्यशाळा**

आमच्या संस्थेच्या अॅडव्हान्स्ड स्टडी सेंटरच्यावतीने २७ एप्रिल रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात 'इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राईट' (आयपीआर) या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेचे प्रस्ताविक विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले तर डॉ. एम्. डी. नायर यांनी बीज भाषण केले.

नंतरच्या सत्रात डॉ. आनंद पटवर्धन, डॉ. डी.डी. काळे व प्रा. जयेश वेल्हाळ यांनी या विषयासंदर्भात शोध निबंध सादर केले. दुपारच्या सत्रात रमेश सेशा व शकील कुरडोली यांनी आपले शोधनिबंध सादर केले. कार्यशाळेसाठी स्टडी सेंटरचे संचालक डॉ. जी. व्ही. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी काम केले.

## सायंवृत्तच्या बातम्या

या बातम्यात शेवटी दहा मिनिटे एखाद्या अभ्यासू तज्ज्ञ माणसाची ज्वलंत विषयाबाबत मुलाखत घेण्यात येते. रविवार दिनांक १२ मे रोजी आमच्या तंत्रनिकेतनाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. विद्याधर वालावलकर यांची " ग्लोबल वॉर्मिंग" या विषयाबाबत मुलाखत घेण्यात आली होती.

कर्म, ज्ञान, भक्ती यांचा अलगपणा मला सहन होत नाही. काही साधकांची निष्ठा अशी असते की त्यांना कर्मच सुचते, कोणी भक्तीचा स्वतंत्र मार्ग कल्पितात व त्यावरच भर देतात. काहींचा कल ज्ञानाकडे असतो. जीवन म्हणजे केवळ कर्म, केवळ भक्ती, केवळ ज्ञान असा केवलवाद मी मानू इच्छित नाही. उलटपक्षी कर्म, भक्ती, ज्ञान यांची बेरीज असा समुच्चवादही मी मानीत नाही. काही भक्ती, काही ज्ञान, काही कर्म असा उपयुक्ततावादही मला पटत नाही. आधी कर्म, मग भक्ती, मग ज्ञान अशासारखा क्रमवादही मी स्वीकारीत नाही. तिन्ही वस्तूंचा मेळ घालावा असला सामंजस्यवादही मला पसंत नाही. मला असे अनुभवावेसे वाटते की कर्म म्हणजेच भक्ती, म्हणजेच ज्ञान!

गीता प्रवचने- -विनोबा भावे.